# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - २ रे ❑ अंक -२७६ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ शुक्रवार दि.२९ नोव्हेंबर २०२४ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

# नागपूर गोंदिया महामार्गावर शिवशाही बसचा भीषण अपघातात ११ ठार

## दुचाकीस्वाराला वाचवताना उलटली; मुख्यमंत्र्यांकडून मदत जाहीर : अर्जुनी तालुक्यातील खजरी आणि डव्वा गावाजवळ अपघात

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२९गोंदिया**

**नागपूरकडून गोंदियाकडं येणाऱ्या शिवशाही बसचा भीषण अपघात झाला. या अपघातात तब्बल ११ प्रवाशांचा मृत्यू झाल्यानं मोठी खळबळ उडाली. ही घटना सडक अर्जुनी तालुक्यातील खजरी आणि डव्वा गावाजवळ घडली. दुचाकीस्वाराला वाचवताना बस उलटल्यानं हा अपघात झाल्याची माहिती सूत्रांनी दिली. या अपघातात ११ मृतदेह बाहेर काढण्यात आले आहेत, तर आणखी २५-३० प्रवासी गंभीर असल्याची माहिती सूत्रांनी दिली.**



सूत्रांच्या माहितीनुसार, गोंदिया- सडक अर्जुनी मार्गावर डव्वा गावाजवळच्या मुर्दाली जंगल परिसरातून एसटीची शिवशाही बस जात होती. बसची गती मर्यादेहून खूप जास्त होती. अचानक बसने पलटी घेतली. त्यानंतर बस बरेच फुट घासत गेली. या घटने बसमधील प्रवासी गंभीर जखमी झाले. ही माहिती कळताच परिसरातील गावातील नागरिकांनी घटनास्थळी धाव घेत प्रवाश्यांना वाचवण्याचे काम हाती घेतले.

दरम्यान बसमध्ये अडकलेल्या प्रवाश्यांना काढण्यासाठी नागरिकांकडून बसमधील काचाही फोडण्यात आल्या. वृत्त हाती येईपर्यंत बसमधील सुमारे ८ मृतदेह बाहेर काढण्यात स्थानिकांना यश मिळाले होते. पोलिसांनीही घटनेचे गांभिर्य बघत तेथे धाव घेत बंदोबस्त वाढवला. बसमधील प्रवाश्यांना बाहेर काढण्याचे काम युद्ध स्तरावर सुरू असून मृतांची संख्या वाढण्याची शक्यता आहे. अपघाताची माहिती कळताच एसटी महामंडळ, प्रादेशिक परिवहन विभागासह (आरटीओ) इतरही शासकीय यंत्रणेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेतली. तर दुरीकडे अपघातग्रस्त बसमधील जखमींना प्रथम जवळच्या गोरेगाव व सडक अर्जुनीतील ग्रामीण रुग्णालयात व तेथून काही गंभीर रुग्णांना इतरत्र तातडीने हलवण्यात आल्याचीही माहिती उपस्थितांनी दिली. वृत्त मिळेपर्यंत सुमारे आठ मृतदेह बसमधून बाहेर काढण्यात आले होते.

**एसटीच्या प्रवासावर गंभीर प्रश्नचिन्ह**

सर्वात सुरक्षीत सार्वजनिक प्रवासी वाहतुकीचे साधन म्हणून एसटीच्या प्रवासी वाहतुकीकडे बघितले जाते. परंतु या अपघातामुळे एसटी महामंडळाच्या सुरक्षीततेवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. दरम्यान एसटी महामंडळ सध्या आर्थिक कोंडीत आहे. त्यातच महामंडळातील कर्मचाऱ्यांकडून बऱ्याचदा आंदोलनही केले जाते. आंदोलनादरम्यान कामगार संगटनांकडून बऱ्याचदा एसटी बसेसच्या देखभाल-दुरूस्तीच्या कामासह महामंडळात नवीन बसेस येण्याचे प्रमाण कमी असल्याने भंगार बसेसचे प्रमाण जास्त असल्याचाही आरोप होतो. त्यामुळे महामंडळात जुन्या व कालबाह्य बसेसमुळे अपघात वाढत आहे काय? हा प्रश्न उपस्थित झाला आहे. या विषयावर एसटी महामंडळाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांशी भ्रमनध्वनीवर संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता त्यांनी अधिकारी अपघात झालेल्या घटनास्थळी निघाले अशून लवकरच पोहचणार असल्याचे सांगितले. त्यानंतरच वास्तविक स्थळी सांगणे शक्य असल्याचे त्यांचे म्हणने होते.

**मुख्यमंत्र्यांनी घेतली अपघाताची माहिती**

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी गोंदिया-कोहमारा मार्गावर डव्वा जवळ झालेल्या अपघाताची माहिती जिल्हाधिकारी प्रजित नायर यांच्याकडून घेतली. तसेच प्रशासनाला त्वरित आवश्यक त्या उपाययोजना राबविण्याच्या सूचना केल्याची माहिती आहे.

**घटनास्थळावर रक्ताचा सडा**

दुचाकीला ओव्हरटेक करताना भरधाव शिवशाही बस उलटून झालेल्या भीषण अपघातात ११ जण ठार तर २९ प्रवासी जखमी झाले. बसचा वेग अधिक असल्याने ती रस्त्यावर जवळपास २० फूट घासत गेली. त्यामुळे काही प्रवासी बसखाली दबले होते असे प्रत्यक्षदर्शनी सांगितले. तर घटनास्थळावर रक्ताचा सडा पडल्याचे चित्र होते.

**बसमध्ये चाळीस प्रवासी**

भंडारा-गोंदिया या शिवशाही बस क्रमांक एम.एच.०९, एम १२७३ ही भंडाराहून गोंदियाकडे येत असताना गोंदिया-कोहमारा मार्गावरील डव्वा जवळ हा अपघात झाला. या बसमध्ये जवळपास ४० प्रवासी प्रवास करीत असल्याची प्राथमिक माहिती आहे.

# देवेंद्र फडणवीसच मुख्यमंत्री, दिल्लीचा ग्रीन सिग्नल अधिकृत घोषणा आज होणार, सूत्रांची माहिती

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२९ मुंबई**



अमित शाह यांच्यासोबत गुरुवारी दिल्लीमध्ये महाबैठक पार पडली. एकनाथ शिंदे, देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार यांच्यासोबत अमित शाह यांनी खातेवाटप अन् मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यावर चर्चा झाली. दिल्लीमध्ये झालेल्या बैठकीची माहिती गुलदस्त्यात होता. आज मुंबईमध्ये होणार्या बैठकीमध्ये याला अंतिम स्वरुप मिळणार आहे. मुख्यमंत्री म्हणून देवेंद्र फडणवीस यांचेच नाव फायनल झाल्याची माहिती मिळत आहे. अधिकृत माहिती आज जाहीर होऊ शकते.

**एकनाथ शिंदे उपमुख्यमंत्री राहणार?**

महायुतीच्या सराकरमध्ये एकनाथ शिंदे यांनी उपमुख्यमंत्री म्हणून काम पाहावे, असा आग्रह केंद्रीय नेतृत्वाने केल्याचं समजतेय. महायुतीमध्ये कोणतीही नाराजी नाही, हे दाखवण्यासाठी एकनाथ शिंदे यांना उपमुख्यमंत्री होण्याचा आग्रह केंद्रीय नेतृत्वाकडून करण्यात आलाय. एकनाथ शिंदे काय निर्णय घेणार? याकडे आता सर्वांचे लक्ष लागलेय.

**फॉर्म्युला काय ठरला?**

खातेवाटपावर दिल्लीमध्ये खलबतं झाले. अडीच तास शिर्ष नेतृत्वामध्ये खातेवाटपावर चर्चा झाली. मंत्रिपदाचा फॉर्म्युलाही ठरला, अधिकृत घोषणा अद्याप झालेली नाही. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, भाजपला सर्वाधिक मंत्रिपदे मिळतील. भाजप २० ते २२ मंत्रिपदे आपल्याकडे ठेवणार आहे. तर एकनाथ शिंदे यांना १०-१२ मंत्रिपदे मिळतील. अजित पवार यांना ८-९ मंत्रिपदे मिळण्याची शक्यता आहे.

# विधानसभा झाली, आता विधान परिषदेसाठी नेत्यांची लॉबिंग

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२९ मुंबई**



नुकत्याच झालेल्या महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणुकीनंतर आता विधान परिषदेच्या जागांसाठी जोरदार राजकीय चढाओढ पाहायला मिळत आहे. विविध पक्षांनी त्यांच्या उमेदवारांची निवडणूकीसाठी कंबर कसली असून, आगामी विधानपरिषद निवडणुक अनेक पक्षांसाठी प्रतिष्ठेचा प्रश्न बनला आहे.

राज्यातील विधान परिषदेच्या जागांवर निवडणुका होणार असून, यामध्ये शिक्षक आणि पदवीधर मतदारसंघांबरोबरच स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघांचाही समावेश आहे. या निवडणुकांसाठी राजकीय पक्षांच्या हालचाली वेगाने सुरू आहेत. प्रमुख पक्षांनी त्यांच्या उमेदवारांच्या नावांवर चर्चा सुरू केली आहे, तर काही ठिकाणी युतीच्या शक्यता तपासल्या जात आहे.


**प्रतिष्ठेची ठरणार विधानपरिषदेची निवडणूक**

निवडणुकांमध्ये सत्ताधारी आणि विरोधी पक्षांमध्ये चुरस दिसून येत आहे. सत्ताधारी महायुती सरकारसाठी या निवडणुका महत्त्वाच्या ठरणार आहेत. विधान परिषदेत बहुमत वाढवण्यासाठी हे निवडणुकीचे निकाल निर्णायक ठरू शकतात. दुसरीकडे, विरोधी महाविकास आघाडीनेही या निवडणुकांमध्ये जोरदार कामगिरी करण्याचा निर्धार केला आहे. विधानसभेच्या निवडणूकीत विशेष कामगिरी दाखविता न आल्याने आता महाविकास आघाडीने सर्व लक्ष विधानपरिषदेच्या निवडणूकांवर केंद्रीत केले असल्याचे सुत्रांनी सांगितले.

विधान परिषदेच्या निवडणुकांमध्ये शिक्षक आणि पदवीधर मतदारसंघांचे वेगळे वैशिष्ट्य आहे. शिक्षण क्षेत्रातील प्रश्न आणि स्थानिक मुद्दे यावर भर देत उमेदवार आपले अभियान राबवणार आहेत. तसेच, स्थानिक स्वराज्य संस्थांमधील निवडणुकीत स्थानिक नेतृत्व महत्त्वाची भूमिका बजावणार आहे. राजकीय विश्लेषकांच्या मते, विधान परिषदेच्या जागा हे केवळ निवडणुकीचे मैदान नसून पक्षांच्या राजकीय ताकदीचे मोजमापही ठेल. या निवडणुकांमुळे राज्यातील राजकीय वातावरण अधिक तापले आहे. निवडणुकीच्या तारखा अजून जाहीर झालेल्या नसल्या तरी, सध्या सुरू असलेल्या हालचालींवरून लवकरच प्रचाराची रणधुमाळी पाहायला मिळणार आहे. या निवडणुकांचे निकाल महाराष्ट्राच्या राजकीय समीकरणांवर मोठा प्रभाव टाकण्याची शक्यता आहे.

# राज कुंद्राच्या घरी ईडीचे धाडसत्र, कार्यालयातही झाडाझडती

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२९मुंबई**



पोर्नोग्राफी नेटवर्क संदर्भात सक्तवसुली संचालनालयाने (ईडी) बॉलीवूड अभिनेत्री शिल्पा शेट्टीचा पती राज कुंद्रा मुंबईतील राहत्या घरी छापा टाकला आहे. यासोबत राज कुंद्रा यांच्या मुंबईतील कार्यालयांवरही ईडीच्या अधिकाऱ्यांकडून धाडसत्र सुरू आहे.

राज कुंद्राला जून २०२१ मध्ये अश्लील व्हिडिओग्राफी संदर्भातील आरोपांवरुन अटक करण्यात आली होती. पोर्नोग्राफी व्हिडिओ संदर्भात राज कुंद्रा मुख्य आरोपी असल्याचा दावा मुंबई पोलिसांनी केला होता. दोन महिन्यांचे कारागृहात राहिल्यानंतर राज कुंद्रा सप्टेंबर २०२१ पासून जामीनावर आहे.

पोलिसांच्या दाव्यानुसार, राज कुंद्रा आणि त्यांची कंपनी पोर्नोग्राफी फिल्मच्या माध्यमातून प्रचंड कमाई करत होते. यात सर्व नियमांचा भंग केला जात होता. याप्रकरणी एका तरुणीनं मुंबईच्या मालवणी पोलीस ठाण्यात या रॅकेट संदर्भात पहिल्यांदा ४ फेब्रुवारी २०२१ रोजी तक्रार दाखल केली होती. त्यानंतर याप्रकरणाच्या चौकशीला सुरुवात झाली होती.

# तिढा सुटेना, महायुतीचे नेते पुन्हा दिल्लीला जाणार, का होतोय सत्तास्थापनेस उशीर?

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२९मुबई**

विधानसभा निवडणुकीच्या निकालांमध्ये महायुतीला स्पष्ट बहुमत मिळून आठवडा उलटत आला तरी राज्यात नवं सरकार स्थापन होऊ शकलेलं नाही. भाजपा आणि शिवसेना शिंदे गट व राष्ट्रवादी अजित पवार गट यांच्यात निर्माण झालेला सत्तास्थापनेचा तिढा अद्याप सुटलेला नाही. त्यामुळे राज्यात नव्या सरकारचा शपथविधी होण्यास उशीर का होत आहे, असा प्रश्न सर्वसामान्यांना पडला आहे. महायुतीने अद्याप विधिमंडळाच्या नेत्याचीही निवड केलेली नाही.

मुख्यमंत्रिपद कुणाला द्यायचं हे निश्चित होत नसल्याने नव्या सरकारचा शपथविधी होत नसल्याचे बोलले जात होते. मात्र गुरुवारी रात्री झालेल्या महायुतीच्या नेत्यांच्या बैठकीनंतर भाजपालाच मुख्यमंत्रिपद मिळेल आणि मुख्यमंत्रिपदासाठी देवेंद्र फडणवीस यांचं नाव निश्चित झाल्याचं सांगण्यात येत आहे. काल रात्री झालेल्या बैठकीत अमित शाह यांनी फडणवीस यांना पुष्पगुच्छ देऊन तसे संकेत दिले होते.

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार या शनिवार आणि रविवारी अमावस्या आहे. त्या दिवशी शुभकार्य केलं जात नाही. त्यामुळे त्या दिवशी भाजपाच्या आमदारांची बैठक होण्याची शक्यता कमी आहे. रविवारी दुपारपर्यंत अमावस्या आहे. त्यामुळे त्यानंतर आमदारांचा बैठक होऊन पुढच्या काही दिवसांत नव्या सरकारचा शपथविधी होण्याची शक्यता आहे.

मुख्यमंत्रिपदाचा वाद सुटला असला तरी महायुतीमध्ये मंत्रिमंडळातील जागावाटप आणि खातेवाटपावरून तिढा निर्माण झालेला आहे. भाजपाला मुख्यमंत्रिपदासह किमान २० मंत्रिपदं हवी आहेत. तर एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेला १० ते १२ मंत्रिपदं हवी आहेत. अजित पवार गटालाही ८ ते १० मंत्रिपदं हवी आहेत. त्याबरोबरच वित्तमंत्रालयावर अजित पवार गटाचा डोळा आहे. दरम्यान, अमावस्या संपल्यानंतर महायुतीचे नेते पुन्हा एकदा दिल्लीला जाण्याची शक्यता आहे. तसेच तिथे अमित शाह यांच्यासोबत पुन्हा बैठक होणार असल्याचे सांगण्यात येत आहे.

# नाना पटोले संघाचे हस्तक, त्यांना आरएसएस मध्येच पाठवा, काँग्रेसच्या पराभूत उमेदवाराचा गंभीर आरोप

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२९मुंबई**

महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकीत महाविकास आघाडीला दारुण पराभवाचा सामना करावा लागला होता. त्यात काँग्रेसचीही मोठी पिछेहाट झाली होती. तसेच एकेकाळी महाराष्ट्रात निर्विवाद सत्ता असणाऱ्या काँग्रेसला केवळ १६ जागांवर समाधान मानावं लागलं. या पराभवानंतर आता काँग्रेसमध्ये अंतर्गत वादाला तोंड फुटू लागले आहे. दरम्यान, काँग्रेसचे नागपू मध्य विधानसभा मतदारसंघातील पराभूत उमेदवार बंटी शेळके यांनी पक्षाचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांच्यावर गंभीर आरोप केले आहेत. नाना पटोले हे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाशी संबंध ठेवून आहेत. त्यामुळे त्यांची पक्ष संघटनेतून हकालपट्टी करून त्यांना पुन्हा संघामध्येच पाठवावे, अशी मागणी बंटी शेळके यांनी केली आहे.

नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत नागपूर मध्य विधानसभा मतदारसंघामध्ये भाजपाचे प्रवीण दटके विरुद्ध काँग्रेसचे बंटी शेकळे अशी लढत झाली होती. अटीतटीच्या झालेल्या या लढतीत भाजपाच्या प्रवीण दटके यांनी काँग्रेसच्या बंटी शेळके यांचा ११ हजार ६३२ मतांनी पराभव केला होता. या पराभवानंतर आता बंटी शेळके यांनी निवडणुकीदरम्यान झालेल्या असहाकार्यावरून पक्षाचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांना टीकेचं लक्ष्य केलं आहे.

बंटी शेळके नाना पटोलेंवर टीका करताना म्हणाले की, डरो मत अशा संदेश आमचे नेते राहुल गांधी यांनी दिला आहे. त्या संदेशानुसार मी य नाविडणुकीतील वस्तुस्थिती मांडत आहे. मागच्या निवडणुकीतही मी ४ हजार मतांनी पराभूत झालो होतो. त्यावेळीही नाना पटोले यांनी माझं कार करू नये अशी सूचना कार्यकर्त्यांना दिली होती. काही नियुक्त्या माझ्या विरोधात करण्यात आल्या होत्या. नागपूर मध्य मतदारसंघात कुणाला पद हव असल्यास माझ्यावर टीका करा असं सांगण्यात येत असे, असा दावाही बंटी शेळके यांनी केला.



विधानसभा निवडणुकीत पक्षाकडून झालेल्या असहकार्याबाबत नाराजी व्यक्त करताना बंटी शेळके म्हणाले की, आमचे नेते राहुल गांधी यांनी मला उमेदवारी दिली होती. मात्र माझा घात होईल, अशी मला कल्पना नव्हती. पक्षाचं चिन्ह असूनही नागपूर मध्य मतदारसंघात माझी अवस्था ही अपक्ष उमेदवारासारखी झाली होती. येथून काँग्रेसची पूर्ण पक्षसंघटना गायब होती. काही बोटावर मोजण्याइतके कार्यकर्तेच माझ्याबरोबर होते. नाना पटोले यांनी इतर कार्यकर्त्यांची भाजपासोबत हातमिळवून घडवून आणली होती, असा आरोपही बंटी शेळके यांनी केला. नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत नागपूर मध्य विधानसभा मतदारसंघामध्ये भाजपाचे प्रवीण दटके विरुद्ध काँग्रेसचे बंटी शेकळे अशी लढत झाली होती. अटीतटीच्या झालेल्या या लढतीत भाजपाच्या प्रवीण दटके यांनी काँग्रेसच्या बंटी शेळके यांचा ११ हजार ६३२ मतांनी पराभव केला होता. या पराभवानंतर आता बंटी शेळके यांनी निवडणुकीदरम्यान झालेल्या असहाकार्यावरून पक्षाचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांना टीकेचं लक्ष्य केलं आहे.

बंटी शेळके नाना पटोलेंवर टीका करताना म्हणाले की, डरो मत अशा संदेश आमचे नेते राहुल गांधी यांनी दिला आहे. त्या संदेशानुसार मी य नाविडणुकीतील वस्तुस्थिती मांडत आहे. मागच्या निवडणुकीतही मी ४ हजार मतांनी पराभूत झालो होतो. त्यावेळीही नाना पटोले यांनी माझं कार करू नये अशी सूचना कार्यकर्त्यांना दिली होती. काही नियुक्त्या माझ्या विरोधात करण्यात आल्या होत्या. नागपूर मध्य मतदारसंघात कुणाला पद हव असल्यास माझ्यावर टीका करा असं सांगण्यात येत असे, असा दावाही बंटी शेळके यांनी केला.

विधानसभा निवडणुकीत पक्षाकडून झालेल्या असहकार्याबाबत नाराजी व्यक्त करताना बंटी शेळके म्हणाले की, आमचे नेते राहुल गांधी यांनी मला उमेदवारी दिली होती. मात्र माझा घात होईल, अशी मला कल्पना नव्हती. पक्षाचं चिन्ह असूनही नागपूर मध्य मतदारसंघात माझी अवस्था ही अपक्ष उमेदवारासारखी झाली होती.

## संपादकीय ......

# काँग्रेसपुढे अस्तित्वाचे आव्हान

महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणुका नुकत्याच पार पडल्या आणि त्यात काँग्रेस पक्षाचा 'न भूतो न भविष्यति' असा दारुण पराभव झाल्याचे विदारक वास्तव समोर आले आहे. एकशे चाळिसाव्या वर्षात पदार्पण करणार्या या पक्षाची विद्यमान अवस्था अतिशय दयनीय अशी आहे.एकेकाळी महाराष्ट्र विधानसभा लढवीत काँग्रेसचे २२२ आमदार विजयी झाले आहेत. हा विक्रम कोणाला आजवर तोडता आलेला नाही; पण आता मात्र अवघी १६ आमदार संख्या काँग्रेसच्या पदरात पडली आहे. काँग्रेसच्या दृष्टीने हे पानिपतच म्हटले पाहिजे. बाळासाहेब थोरात यांच्यासारख्या आठ वेळा आमदारकीची निवडणूक जिंकणार्या दिग्गज नेत्याला पराभव पत्करावा लागला, यावरून काँग्रेसची जनमान्यता किती रसातळाला पोहोचली आहे, याचा अंदाज बांधता येतो. गेल्या चाळीस वर्षांत काँग्रेसची सातत्याने घसरण होत गेली आणि काँग्रेसची जागा पाहता पाहता भारतीय जनता पक्षाने व्यापली. डोळ्यांदेखत पक्षाचा र्हास होत असताना पक्षाचे नेतृत्व डोळ्यांवर कातडे ओढून स्वस्थ बसले होते, असाच निष्कर्ष या पराभवातून काढावा लागेल.महाराष्ट्र म्हणजे कार्यकर्त्यांचे मोहोळ आहे, असे महात्मा गांधी म्हणत असत आणि महाराष्ट्रातील काँग्रेस संघटनेबाबत त्यांचे हे विधान तंतोतंत सत्य होते. १९५७ आणि १९६२ साली झालेल्या विधानसभा निवडणुकीवेळी काँग्रेसपुढे विरोधकांचे जबरदस्त आव्हान होते. १९५७ मध्ये संयुक्त महाराष्ट्राचे आंदोलन अगदी भरात होते आणि काँग्रेस कार्यकर्त्यांना प्रचार करणे मुश्कील झाले होते. बेळगावसह मराठी भाषिक भाग कर्नाटकात (तेव्हाच्या म्हैसुरात) गेल्याने संयुक्त महाराष्ट्राचा मंगल कलश आला, तरी काँग्रेस विरोधाची धार तीव्र होती; पण असे असूनही भक्कम संघटना आणि राज्य नेतृत्वाची बुलंद फळी या जोरावर काँग्रेस पक्षाने विपरीत परिस्थितीतही विधानसभेत बहुमत मिळवले होते. सध्या काँग्रेसची अवस्था महाराष्ट्रात तरी निर्नायकी झाली आहे आणि संघटना खिळखिळी होऊन गेली आहे.

१९६७ साली संपूर्ण देशात महागाईसह विविध कारणांनी काँग्रेसच्या विरोधात जनमत गेले होते. नऊ राज्यांत काँग्रेसला विरोधी बाकावर बसावे लागले होते. मात्र, महाराष्ट्रात लोकसभा निवडणुकीत स. का. पाटील यांच्यासारखा काँग्रेसचा मुंबईतील अनभिषिक्त सम्राट, महारथी पराभूत होत असताना, विधानसभेत मात्र काँग्रेसने बहुमत राखले होते. १९५७ ते १९६७ या काळातील जनमताचा सूर विरोधी असतानाही यशवंतराव चव्हाण, वसंतरावदादा पाटील, बाळासाहेब देसाई, वसंतराव नाईक अशा दिग्गज नेत्यांनी पक्षाला विजय मिळवून दिला. हे नेतृत्व तळागाळात रुजलेले होते आणि जनसामान्यांच्या आशा-आकांक्षांशी एकरूप झाले होते. या नेत्यांनी लोककल्याणाचे अनेक महत्त्वाचे निर्णय घेतले. त्यामुळे राज्याच्या विकासाला चालना मिळाली. जिल्हा परिषद, पंचायत समित्यांच्या माध्यमातून ग्रामीण भागातून नवे नेतृत्व उभे राहिले. सहकाराला चालना मिळाल्याने ग्रामीण भागात साखर कारखाने, दूध संघांच्या माध्यमातून नवी अर्थव्यवस्था आकाराला आली. शैक्षणिक सवलतीतून नवी पिढी साक्षर झाली. या सार्या सुधारणांचे श्रेय या नेत्यांचे आणि त्यामुळे जबरदस्त विरोध असूनही काँग्रेस सत्तेवर राहिली. त्यातूनच १९६९ साली काँग्रेस पक्ष फुटूनही १९७१ ची लोकसभा निवडणूक आणि १९७२ ची महाराष्ट्र विधानसभा निवडणूक काँग्रेसने सहज जिंकली. १९७२ च्या महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणुकीत काँग्रेसने २२२ जागा जिंकून विक्रम केला. तो अबाधित आहे. आणीबाणीनंतर १९७७ साली लोकसभा निवडणुका झाल्या, तेव्हा काँग्रेसला जनतेच्या रोषाला सामोरे जावे लागले. त्यावेळी काँग्रेसला लोकसभेत १५४ जागा मिळाल्या होत्या. अलीकडील तीन निवडणुकांपेक्षाही या जागा अधिक होत्या. आणीबाणीनंतर १९७८ ला झालेल्या विधानसभा निवडणुकीत काँग्रेसने ६७ जागा जिंकल्या होत्या. आताच्या निवडणुकीत अवघ्या १६ जागा काँग्रेसच्या पदरात पडल्या आहेत. काँग्रेसची केवढी घसरण झाली आहे, हे यावरून स्पष्ट होईल.१९८४ च्या लोकसभा निवडणुकीत काँग्रेसने ४१५ जागा जिंकल्या होत्या. हा उच्चांक गाठताना काँग्रेसने ४८ टक्क्यांहून अधिक मते मिळवली होती. श्रीमती इंदिरा गांधी यांच्या हत्येमुळे निर्माण झालेल्या लाटेत काँग्रेसने विरोधकांची धूळदाण केली होती; पण काँग्रेसचे विमान पुढच्याच लोकसभा निवडणुकीत खाली उतरले आणि १९८९ च्या लोकसभेत काँग्रेसला १९७ जागा मिळून विरोधी बाकावर बसावे लागले. १९८० ते १९८९ या दशकभरातील कालावधील पक्षश्रेष्ठींच्या संघटनात्मक निर्णयातील गंभीर चुका नडत गेल्या आणि पक्षाला धक्के बसत गेले. खरे तर आणीबाणी च्या काळापासूनच पक्षात एकाधिकार शाही, राज्य नेतृत्वाचा तोंडपूजेपणा, लाचारी अशा दुर्गुणांची वहिवाट झाली. संजय गांधी यांचे बूट उचलण्यापर्यंत राज्य नेत्यांची मजल गेली, तर राज्याराज्यांतील नेतृत्वाचे खच्चीकरण सुरू झाले. वसंतरावदादा पाटील यांच्यासारखे सक्षम नेतृत्व असताना बाबासाहेब भोसले यांची मुख्यमंत्रिपदावर वर्णी लागली. आंध्र प्रदेशातील मातब्बर नेत्यांना बाजूला सारून टी. अंजय्या यांच्यासारख्या होयबाला मुख्यमंत्रिपद मिळाले. अनेक राज्यांत हेच घडले आणि राज्याराज्यांतील नेतृत्वाच्या खच्चीकरणाने परत संघटना दुबळी होत गेली. महाराष्ट्राला त्याचा फटका बसला.

# जमीन व्यवहारातील फसवणूक आता टळणार; राज्यात 'ग्रिस्टॅक' योजना राबवणार

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२९पुणे-** तुमच्या जमिनीचे तुम्हीच मालक असण्याची सरकार दरबारी ओळख म्हणजे कागदोपत्री असलेली नोंद. मात्र, जमिनीची खरेदी-विक्री होताना नकळत काही व्यवहार झाल्यास तुम्हाला कल्पना असते का, नाही ना? मग आता तुमच्या जमिनीचे मालक असण्यासाठी अधिकार अभिलेखाला तुमचा आधार आणि मोबाइल क्रमांक जोडा. त्यातून जमिनीचे मालक असल्याचे सिद्ध होऊन व्यवहारांबाबत होणारी फसवणूक टळणार आहे. येत्या १५ डिसेंबरपासून राज्यातील प्रत्येक गावात तलाठी घरोघरी जाऊन ग्रिस्टॅक योजनेची अंमलबजावणी करणार आहेत.

भूमिअभिलेख विभाग राज्यात ग्रिस्टॅक ही योजना कृषी विभागाच्या मदतीने राबविणार आहे. यात शेतकऱ्यांचे ओळखपत्र तयार केले जाणार आहे. त्यात शेतकऱ्याचे नाव, त्याच्या जमिनीची माहिती व आधार क्रमांक जोडला जाणार आहे. यातून शेतकऱ्यांची संख्या, त्यांच्याकडील जमिनीचे नेमके क्षेत्र कळू शकणार आहे. मात्र, त्यासोबतच अधिकार अभिलेखांनाही आधार जोडणी करण्याची परवानगी द्यावी, असा प्रस्ताव भूमिअभिलेख विभागाने केंद्र सरकारकडे दिला होता. त्याला केंद्र सरकारने मान्यता दिली आहे.



### असा उपक्रम

अधिकार अभिलेख अर्थात राइटस् ऑफ रेकॉर्डमध्ये एखादा शेतकरी जमिनीचा मालक असल्याची ओळख राज्य सरकारला पटवून देणार आहे. त्यासाठी तलाठ्याकडे समक्ष जाऊन जमिनीची नोंद केली जाईल. जमिनीचा मालक हा तोच शेतकरी असल्याची खात्री तलाठी कोतवालाकडून करील. शेतकऱ्याची ओळख निर्माण करण्यासाठी त्याचा आधार व मोबाइल क्रमांक जोडला जाईल.

### असा होईल फायदा

जमिनीच्या खरेदी-विक्रीबाबत होणाऱ्या व्यवहारांमध्ये संमती असण्याशिवाय संबंधित शेतकऱ्याची पडताळणी करता येत नव्हती. त्यामुळे अनेक गैरव्यवहार होत होते. मात्र, आता अधिकार अभिलेखाला आधार जोडल्याने अशा व्यवहाराची माहिती संबंधित शेतकऱ्याला असावी, यासाठी भूमिअभिलेख विभागाकडून एसएमएसद्वारे ओटीपी दिला जाईल. हा ओटीपी दिल्यानंतरच व्यवहार पूर्ण होणार आहे.

राज्यातील सर्व ४४ हजार २९६ गावांमध्ये शेतकरी ओळखपत्रासह अधिकार अभिलेखाला आधार जोडणीचे काम तलाठी करणार आहेत. येत्या तीन महिन्यांत हा प्रकल्प पूर्ण करण्यात येणार आहे. **– सरिता नरके,** राज्य संचालक, ई फेरफार प्रकल्प, भूमिअभिलेख विभाग, पुणे

# निर्यातक्षम भाजीपाला उत्पादन घेताना लागवडीपूर्वी व लागवडीनंतर कशी घ्याल काळजी

**दि.२९विदर्भ प्रजासत्ताक**

जगाला लागणाऱ्या सर्व कृषिमालाचे उत्पादन भारतात होते. भारतातून १७० देशांना विविध प्रकारचा कृषि माल निर्यात केला जातो. त्यामध्ये प्रामुख्याने फळे, फुले व भाजीपाला या पिकांचा समावेश होतो.

आरोग्याच्या दृष्टीकोनातून जागतिक व स्थानिक ग्राहकामध्ये जागरूकता निर्माण झालेली आहे. त्यामुळे कृषि मालाच्या गुणवत्ते बरोबरच अन्नाच्या सुरक्षिततेबाबत ग्राहकांना हमी देणे आवश्यक झालेले आहे. येथून पुढे गुणवत्तेची हमी देण्याकरीता खालील बाबींवर विशेष भर द्यावा लागणार आहे.

लागवडीपूर्वीची काळजी

पिकांची लागवड बियांपासून करत असल्यामुळे, लागवडीपूर्वी बियाण्यास थायरम किंवा कॅप्टन किंवा कार्बेन्डॅझीम ३ ग्रॅम प्रती किलो या प्रमाणात घेऊन बियाण्यास बीजप्रक्रिया करावी

२) तसेच टोमॅटो, मिरची, वांगी, इ. पिकांची लागवड रोपे तयार करून पुनर्लागवड पद्धतीने करत असल्यामुळे लागवडीपूर्वी रोपे बुरशीनाशकाच्या द्रावणात बुडवून लावावीत म्हणजे लागवडीनंतर जमिनीतील बुरशी किंवा किडीमुळे रोपावर प्रादुर्भाव होणार नाही. त्यासाठी, डायथेन एम-४५ २५ ग्रॅम + कार्बेन्डॅझीम किंवा इमिडाक्लोप्रीड १० मिली + १० लिटर पाणी या प्रमाणात घेऊन रोपे त्यामध्ये बुडवून रोपांची पुनर्लागवड करावी.

लागवडीनंतरची काळजी

भाजीपाला पिकांमध्ये सुरुवातीला रस शोषणाऱ्या किडींचा प्रादुर्भाव दिसून येतो. त्यामध्ये मावा,




पांढरी माशी, फुलकिडे, तुडतुडे व तसेच कोळी या किडींचा अंतरभाव होतो. ज्या भाजीपाला पिकांची रोपांपासून पुर्नलागवड करावयाची असेल उदा. त्यामध्ये मिरची, टोमॅटो, वांगी, कोबी/फ्लॉवर इ. पिकांची चांगली काळजी घ्यावी लागते.

कारण या पिकांवर सुरुवातीलाच जर रस शोषणाऱ्या किडींचे नियंत्रण झाले नाही तर पुढे विषाणूजन्य, जीवाणूजन्य रोगांचा फैलाव होऊ शकतो. म्हणून या रस शोषणाऱ्या किडींचे रोपवाटीकेपासून व्यवस्थापन करणे अत्यंत महत्त्वाचे आहे.

पुढे बहुतेक भाजीपाला पिकांमध्ये पाने पोखरणारी अळी (नागअळी), शेंडा व फळ पोखरणारी अळी, रोपे/देठ कुरतडणारी अळी, फळमाशी इत्यादी किडींचा प्रादुर्भाव वाढू शकतो.

त्यासाठी एकात्मिक कीड व्यवस्थापनाचा आराखडा आखून नियंत्रण करणे महत्वाचे आहे. या पद्धतीमध्ये मशागतीय, यांत्रिक, भौतिक, जैविक व गरजेनुसार रासायनिक पध्दतींचा एकंदरीत सुसंगतपणे वापर करावा.

पिक संरक्षणासाठी महत्वाच्या बाबी

१) पिकावरील किडी व रोगाचे नियंत्रण करण्याकरीता शिफारस केलेल्या औषधांचाच (कीटकनाशके/बुरशीनाशके) वापर करण्यात यावा.

२) वापरास बंदी घातलेल्या औषधांचा वापर करू नये.

३) औषधांची फवारणी शिफारस केलेल्या मात्रेत व योग्यवेळी व योग्य प्रमाणात करावी.

४) युरोपियन कमिशन/कोडेक्स कमिशन यांनी निर्धारीत केलेल्या मर्यादेच्या आत उर्वरीत अंशाचे प्रमाण असणे आवश्यक आहे त्यामुळे औषधांची फवारणी प्रशिक्षीत व्यक्तिद्वारे व योग्य त्या मात्रेत करावी.

५) वापर करण्यात आलेल्या औषधांचा तपशील ठेवावा.

६) फळाची काढणी व अंतिम फवारणीमध्ये किती अंतर ठेवले होते याचा तपशील ठेवावा.




# व्हिटॅमिन्सची कमतरता आहे?

**दि.२९ विदर्भ प्रजासत्ताक**

पुरुषांमधील व्हिटॅमिन्सच्या कमतरतेकडे बर्याचदा दुर्लक्ष केले जाते. याचा संपूर्ण आरोग्यावर विपरीत परिणाम होऊ शकतो.

ताणतणाव, फास्ट फूडचे सेवन आणि सूर्यप्रकाशाचा अभाव तसेच बैठ्या जीवनशैलीमुळे जीवनसत्त्वे डी, बी १२ आणि मॅग्नेशियमची कमतरता निर्माण होते. हे पोषक घटक केवळ ऊर्जा पातळी राखण्यासाठी आवश्यक नाहीत, तर ते संप्रेरकाच्या संतुलनात महत्त्वपूर्ण भूमिका बजावतात. पुरुषांमधील टेस्टोस्टेरॉनची पातळी आणि मूड डिसऑर्डर यांसारख्या आरोग्यविषयक समस्यांबद्दल जागरूकता वाढवून व्हिटॅमिनची कमतरता दूर करणे गरजेचे आहे.



व्हिटॅमिन्सची कमतरता आणि त्याचा पुरुषांच्या प्रजनन आरोग्यावर होणारा परिणाम व्हिटॅमिन ई ची कमतरता ही शुक्राणूंच्या कार्यामध्ये बिघाड निर्माण करू शकते, ज्यामुळे गर्भधारणेत अडचणी येतात. पुरुषांनी सर्व आवश्यक जीवनसत्त्वांचा आपल्या आहारात समावेश करावा.

व्हिटॅमिनच्या कमतरतेमुळे पुरुषांच्या प्रजनन आरोग्यावर परिणाम होऊ शकतो. उदाहरणार्थ, व्हिटॅमिन डी केवळ हाडांच्या आरोग्यासाठी आवश्यक नाही, तर ते टेस्टोस्टेरॉन उत्पादनातही महत्त्वपूर्ण भूमिका बजावते. कमी पातळीमुळे टेस्टोस्टेरॉन कमी होऊ शकते, ज्यामुळे कामवासना आणि प्रजनन क्षमता प्रभावित होते.

आहारात आवश्यक पोषक तत्त्वांचा समावेश करताना एखाद्याला तज्ज्ञांची मदत घ्यावी लागते. तज्ज्ञांच्या सल्ल्यानुसार आहारात व्हिटॅमिनयुक्त पदार्थांचा समावेश करणे हे प्रजनन आरोग्यासाठी गेम चेंजर ठरू शकते. बदाम आणि एवोकॅडोसारखे व्हिटॅमिन ई असलेले पदार्थ पुरुषांमध्ये प्रजनन क्षमता वाढवतात. रंगीबेरंगी फळे आणि भाज्यांमध्ये आढळणारे व्हिटॅमिन सी आणि ई सारखे जीवनसत्त्व शरीरास मिळणे आवश्यक असते. बेरीची फळे खाणे तसेच आहारात काजूचा समावेश केल्याने केवळ आहारच सुधारत नाही, तर प्रजनन आरोग्य देखील सुधारते. व्हिटॅमिन डी केवळ हाडांच्या आरोग्यासाठी आवश्यक नाही, तर टेस्टोस्टेरॉनच्या उत्पादनात देखील मदत करते, ज्याचा कामवासना वाढीसाठी आणि शुक्राणूंच्या गुणवत्तेवर लक्षणीय परिणाम होतो.सॅल्मन किंवा सार्डिन सारख्या माशांची आहारात निवड करावी. दुग्धजन्य पदार्थसुद्धा व्हिटॅमिन डीची पातळी वाढवतात.

# पदवी अभ्यासक्रम अवधी कमी-जास्त करता येणार

## विद्यार्थ्यांसाठी UGC ची नवीन योजना काय?

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि. २९नवी दिल्ली** देशातील उच्च शिक्षण संस्था आता पदवीपूर्व विद्यार्थ्यांना पदवी अभ्यासक्रमाचा कालावधी कमी-जास्त करण्याचा पर्याय देणार आहेत. यासाठी जलद पदवी कार्यक्रम (एडीपी) आणि विस्तारित पदवी कार्यक्रम (ईडीपी) राबवण्याची परवानगी या आठवड्यात झालेल्या बैठकीत उच्च शिक्षण संस्थांना देण्यात आल्याची माहिती केंद्रीय अनुदान आयोगाचे (यूजीसी) अध्यक्ष जगदीश कुमार यांनी दिली.

विद्यार्थ्याने एडीपी व ईडीपी यापैकी कोणत्या स्वरुपाचे शिक्षण घेतले त्याचा उल्लेख पदवी प्रमाणपत्रावर करण्यात येणार आहे. यासोबतच ही पदवी पुढील शिक्षणासाठी किंवा नोकरीसाठी मानक कालावधीच्या पदवीच्या बरोबरीने ग्राह्य धरली जाणार असल्याचे कुमार यांनी स्पष्ट केले.

### काय आहे योजना?

एडीपी अंतर्गत विद्यार्थ्यांना प्रत्येक सत्रात (सेमिस्टर) अतिरिक्त क्रेडिट्स मिळवून तीन किंवा चार वर्षांच्या कमी कालावधीत पदवी पूर्ण करण्याची परवानगी मिळणार आहे. याशिवाय ईडीपी अंतर्गत प्रत्येक सत्रात कमी क्रेडिट घेऊन अभ्यासक्रमाचा कालावधी वाढवण्याचा पर्याय विद्यार्थ्यांसमोर ठेवण्यात आला आहे.

# सामाजिक दायित्वातून आरोग्य, शिक्षण क्षेत्राला मदत करावी -जिल्हाधिकारी सौरभ कटियार

## जिल्हा शल्यचिकित्सकांकडे वैद्यकीय उपकरणे सुपूर्द

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२९अमरावती-** अमरावती जिल्ह्यात सामाजिक उत्तरदायित्वातून देण्यात येणारी मदत ही प्रामुख्याने आरोग्य आणि शिक्षण क्षेत्राला मदत करणारी असावी, तसेच येत्या काळात सीएसआरमधून मदत करताना जिल्हा प्रशासनाशी समन्वय साधल्यास प्रामुख्याने ज्या बाबींसाठी राज्य शासनाचा निधी येत नाही, अशी उपकरणे आणि सुविधा निर्माण करण्यास मदत होईल, असे मत जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांनी व्यक्त केले.

एनएक्सटी इन्फ्रातर्फे जिल्हा शल्य चिकित्सक यांना पाच व्हेंटीलेटर, ईसीजी मशिन आणि इतर वैद्यकीय उपकरणे सुपूर्द करण्यात आली. जिल्हा शल्य चिकीत्सक कार्यालयात आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. दिलीप सौंदळे, एमएस एनएक्सटी इन्फ्राचे थानगिल्ला मुरली, हरीश सिंग उपस्थित होते एनएक्सटी इन्फ्रातर्फे जिल्ह्यात रस्त्यांचे प्रकल्प पूर्ण केले आहेत. या प्रकल्पांतर्गत सीएसआर निधीतून आरोग्य सुविधांसाठी निधी उपलब्ध करून देण्यात आला. यातून पाच व्हेंटीलेअर, ईसीजी मशिन आणि इतर वैद्यकीय उपकरणे देण्यात आली आहे. या वैद्यकीय उपकरणांतून जिल्हा रूग्णालयात रूग्णांना सुविधा मिळणार आहे. येत्या काळातही कंपनीने सीएसआरमधून आरोग्यासह शिक्षण क्षेत्रातही योगदान द्यावे, असे आवाहन जिल्हाधिकारी श्री. कटियार यांनी केले.



RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

कोणत्याही शंका किंवा अभिप्रायासाठी आम्हाला ईमेल करा -prajasattaknews24gmail.com
या पृष्ठावरील जाहिरातींसाठी किंवा मोफत अंक मो.वर मिळण्यासाठी संपर्क मो.८६२४९८५६३३, प्रिंट / PDF / वेब - पोर्टल /ई - पेपर

# विदर्भ प्रजासत्ताक

शुक्रवार दि. २९ नोव्हेंबर २०२४ शहर/ग्रामिण


# शहराच्या अकोली परिसरात मुंडके छाटलेला मृतदेह आढळला

## शीर शोधून ओळख पटविण्याचे पोलिसांसमोर आव्हान

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९ अमरावती** स्थानिक खोलापुरी गेट पोलीस ठाण्याच्या अंतर्गत आकोली गाव ते म्हाडा कॉलनी दरम्यान स्मशानभूमी जवळ एका अज्ञात व्यक्तीचा शीर गायब असलेला मृतदेह आढळल्याने परिसरात जबरदस्त खळबळ उडाली आहे. या घटनेची माहिती मिळताच पोलिसांसह न्यायवैद्यक प्रयोगशाळेच्या चमुसह ताफा घटनास्थळी दाखल झाला होता.

पोलीस उपायुक्त गणेश इंगळे, उपायुक्त कल्पना बारवकर, क्राइम इन्व्हेस्टीगेशन युनिट, गुन्हे शाखा आदी पोलीस पथकांनी घटनेचा मागोवा घेतला. दरम्यान पोलिसांना घटनास्थळी सत्तुर आणि चष्मा आढळल्याने त्यावरून मृतदेहाची तसेच हल्लेखोरांची ओळख पटविण्याचे प्रयत्न पोलिसांनी





सुरू केले आहे.

मृतदेहाची पटविण्यासाठी ओळख पोलिसांनी न्यायवैद्यक प्रयोगशाळेच्या चमुला घटनास्थळी पाचारण केले. त्यांच्या सुचनेनुसार पोलीस मृत व आरोपीचा शोध घेत आहे. जुन्या वैमनस्यातून ही हत्या निर्दयीपणे करण्यात आल्याचे सकृत दर्शनी दिसून येतआहे. मृतदेहाची पोलिसांनी पाहणी केली असता अत्यंत विभत्स अवस्थेत मृतदेह होता. पोलिसांनी तो मृतदेह ताब्यात घेऊन वैद्यकीय तपासणीसाठी जिल्हा सामान्यरूग्णालयाच्या शवागारात पाठविला. मृत व्यक्ती ही आसपासच्या परिसरातील असू शकते. त्याच्या अंगावरील कपड्यासोबतच त्याची चेहरा पट्टी समोर आणण्याचाप्रयत्न पोलीस करीत आहे. संबंधित व्यक्ती कुठला रहिवासी आहे याचा पोलीस प्राधान्याने विचार करीत आहे. त्यानंतर त्या माध्यमातून हल्लेखोरांपर्यंतपोहचण्याचा मार्ग सुकर होणार आहे. मृत व्यक्तीचे कोणासोबत वैमनस्य होते, कोणासोबत त्याचा वाद झाला होता, त्या वादाचे कारण काय इत्यादी प्रश्नांची उत्तरे मृताची ओळख पटविल्यानंतर मिळणार आहे. पोलीस संबंधित परिसरातील टॉवरवर लोकेट झालेल्या मोबाईलच्या माध्यमातून सुध्दा मृताचा व हल्लेखोरांचा शोध घेऊ शकते त्यादृष्टीने पोलीस यंत्रणा कामाला लागली आहे. मृताची लवकरच ओळख होईल असा विश्वास पोलीस यंत्रणा व्यक्त करीत आहे.

# चिखलदरा@९ तर अमरावतीत १२ अं.से. पर्यंत पारा घसरला

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९ चिखलदरा**



नोव्हेंबर अखेरच्या आठवड्यात थंडीचा ज्वर चढायला लागला असून आता शहरातील बहुतांश भागासह गावागावात सर्वत्रच शेकोट्या पेटायला लागल्या आहेत. सर्वत्रच किमान तापमानात मोठ्याप्रमाणातघसरणझाली असून अमरावती शहरात पारा १२अं.से. पर्यंत तर धारणी–चिखलदऱ्यात पहाटे पारा ९ अं.से. पर्यंत घसरलाय. हवामान खात्याने येत्या तीन दिवसात काही जिल्ह्यात थंडीच्या लाटेचा इशारा दिला आहे. उत्तरेकडून हिमालयाच्या दिशेने येणाऱ्या शीतलहरींचा वेग वाढला आहे. त्यामुळे कोरड्या वाऱ्यांचा परिणाम महाराष्ट्रातील हवामानावर होताना दिसून येत आहे. परिणामी राज्यात येत्या तीन दिवसात थंडीचा कडाका आणखी वाढणार आहे. विशेषकरुन मेळघाट म्हणजे धारणी – चिखलदरा तालुक्यातीलतापमानात मोठ्या प्रमाणात घसरणहोणार असून याठिकाणी थंडीचा जोर वाढणार आहे. दरम्यान, जिल्ह्यांमधील बहुतांश तालुक्यातील कमाल आणि किमान तापमानात वेगाने घसरण होत आहे..

मेळघाट थंडा.. थंडा कुल कुल...प्रामुख्याने चिखलदरा आणि धारणीच्या घाटमाथ्यावर धुक्याची चादर दिसू लागली आहे. मेळघाटच्या धारणी तालुक्यात गुरुवारला होय. से. पर्यंत तापमानाची नोंद करण्यात आली आहे. तर अमरावती शहरात कमाल २९ तर किमान १४ अं. खाली घसरला आहे.

दोन दिवस थंडीचा जोरअमरावती शहरासह मेळघाट आणि संपूर्ण ग्रामीण भागात पुढील दोन तीन दिवस थंडीचा जोर कायम असणार आहे. त्यामुळे रात्री उशिरापर्यंत काम करणाऱ्यांना थंडीपासून बचावासाठी खबरदारी घेणे आवश्यक आहे. दरवर्षी साधारणपणे दिवाळीच्या सुमारास थंडीला सुरुवात होते. मात्र यावेळी उशिराने थंडीला सुरुवात झाली.

### रात्री शेकोट्या, दिवसा गरम कपडे

नोव्हेंबरच्या अखेरचा आठवडा चांगलाच गारठवणारा ठरत आहे. त्यामुळे ग्रामीण भागातच नाही तर शहरात देखील रात्रीच्या वेळी रस्त्यांवर ठिकठिकाणी आणि विशेषकरुन बांधकामाच्या ठिकाणी मजूर, कष्टकरी थंडीपासून बचावासाठी शेकोट्यांचा आधार घेत आहेत. आतापर्यंत रात्री ते पहाटेपर्यंत जाणवणारी थंडी आता दिवसादेखील जोर धरत आहे. त्यामुळेदिवसाही आता गरम कपड्यांचा आधार घ्यावा लागत आहे.

# सक्रीय जनसहभागाने मतदानाच्या टक्केवारीत वाढ –जिल्हाधिकारी सौरभ कटियार

## स्वीपमध्ये सहभागी संस्था, संघटना, नागरिकांचा सत्कार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९अमरावती–** जिल्ह्यात झालेल्या विधानसभा निवडणुकीत मतदारांनी सक्रीय सहभाग नोंदवत उत्साहात मतदान केले. याचा परिणाम म्हणून जिल्ह्याच्या मतदानाच्या टक्केवारीत सहा टक्क्यांनी वाढ झाली आहे. मतदारांमध्ये जनजागृती आणि मतदान करण्याचा चांगल्या अनुभवामुळे या टक्केवारीत वाढ झाल्याचे प्रतिपादन जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांनी केले.

जिल्हा परिषदेत स्वीप उपक्रमांतर्गत सक्रीय सहभाग नोंदविलेल्या संस्था, संघटना, शासकीय यंत्रणा, मतदारसंघात उत्कृष्ट कार्य करणारे प्रतिनिधी, माध्यमांचे प्रतिनिधी यांचा सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता महापात्र, सहायक जिल्हाधिकारी अमर राऊत, महापालिका आयुक्त सचिन कलंत्रे, पोलिस उपायुक्त गणेश शिंदे आदी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी श्री. कटियार यांनी, मतदान करायला आलेल्यांना चांगला अनुभव येणे आवश्यक आहे. यासाठी प्रशासनाने मतदान केंद्र स्वच्छता, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, दिव्यांगांसाठी विशेष व्यवस्था केली. निवडणुकीचे सुनियोजन करण्यात आल्यामुळे संपूर्ण प्रक्रिया शांततेत पार पडली. जनजागृती, हेल्पलाईन, सायकल रॅली अशा विविध उपक्रम ग्रामपातळी ते शहरी भागापर्यंत केल्याने नागरिकांना प्रोत्साहित केले. पोलिस, महापालिका, ग्रामपंचायत, माजी सैनिक, महिला, आशासेविका, सामाजिक संस्था, संघटना, पत्रकार यांच्या



सहकार्यामुळे मतदार आणि प्रशासन यांच्यात दुहेरी संवाद झाला. प्रशासनाने केलेल्या तयारीमुळे विधानसभा निवडणुकीत कोणतीही तक्रार प्राप्त झाली नसल्याचे सांगितले.

श्री. कलंत्रे यांनी मतदान प्रक्रियेत अनेक बदल होत असतानाही मतदारांनी गेल्या ७३ वर्षात लोकशाहीवर विश्वास ठेवला आहे. यामुळे मतदारांचे अभिनंदन करणे योग्य राहिल. विधानसभा निवडणुकीत सर्वांनी चांगला प्रतिसाद दिल्यामुळे मतदानाच्या टक्केवारीत वाढ झाल्याचे सांगितले.

श्रीमती महापात्र यांनी प्रास्ताविकातून नागरिकांपर्यंत पोहोचण्यासाठी विविध उपक्रम राबविण्यात आला. यात त्यांना सहभागी करून घेण्यात आले. स्वीपमध्ये राबविण्यात आलेल्या उपक्रमांना जिल्हाधिकारी यांच्या मार्गदर्शनामुळे अधिक प्रभावीपणे ही मोहिम राबविण्यात आली. या राष्ट्रीय कर्तव्यात प्रशासनाने केलेल्या जनजागृतीमुळे जिल्ह्यात शांततेत मतदान पार पडले. शहर ते ग्रामीण भागातील जनजागृतीच्या उपक्रमात सर्व यंत्रणांनी योगदान दिले.

# दोन लाख ९२ हजार १४८ रेशन कार्ड मोबाइल ला लिंकपुरवठा विभागाचा उपक्रम

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९अमरावती :–** स्वस्त धान्य दुकानातुन मिळालेल्या धान्याचा मोबाईलवर एसएमएस मिळणार आहे. त्यामुळे जिल्ह्यात युध्दस्तरावर जिल्हा पुरवठा विभागाच्या वतीने रेशनकार्डला मोबाईल लिंक करण्याचे काम सुरू असुन आतापर्यंत २ लाख ९२ हजार १४८ नागरीकांचे रेशनकार्ड मोबाईल क्रमाकाला लिंक झाले आहे. अद्यापही ३० टक्के मोबाईल लिंक प्रलंबित असून या प्रक्रियेला आता निवडणुकीनंतर पुन्हावेग आला आहे.

सार्वजनिक वितरण प्रणालीमध्ये पारदर्शी पद्धतीने रेशन धान्याचे वाटप व्हावे, यासाठी पुरवठा विभाग आग्रही आहे. यामध्ये वेळोवेळी अनेक बदल करण्यात आलेले आहे. अशातच रेशनकार्डधारकांचा मोबाईल क्रमांक स्वस्त धान्य दुकानदारांद्वारे फोरजी पॉस मशीनमध्ये लिंक करण्यात येत आहेत. जिल्ह्यातील ३ लाख लाभार्थ्यांची माहिती मेसेजवर येणार आहे. लाभार्थ्यांना त्यांच्या हक्काचे धान्य मिळावे, यासाठी पुरवठा विभागाद्वारा रेशन ठसा जुळत नाही, ओटीपीद्वारे धान्य बरेचदा संबंधित रेशन कार्डधारकाचा कार्डधारकांचे मोबाइल क्रमांक मशीनमध्ये जोडण्यात येत आहे. सध्यादेखील ही प्रक्रिया सुरू आहे.

या मोबाइल क्रमांकावर येणारे एसएमएसऑटो जनरेटेड असल्याची माहितीजिल्हा पुरवठा विभागाने दिली. जिल्ह्यात एकूण अंत्योदय व प्राधान्यगटात ५ लाख ३ हजार १७८ रेशनकार्ड धारक आहेत व यामध्ये १९ लाख ६२



हजार ३४४ सदस्य संख्या आहे. यापैकी सद्य:स्थितीत २ लाख ९२ हजार १४८ रेशन कार्डधारकांनी मोबाइल जोडणीची प्रक्रिया पूर्ण केलेली आहे.

हे प्रमाण ७० टक्के आहे. सर्व रेशनकार्डधारकांनी मोबाइल क्रमांकाची जोडणी करण्याचे आवाहन सहायक जिल्हा पुरवठा अधिकारी प्रज्वल पाथरे यांनी केले आहे.


# सिपना अभियांत्रिकी कॉलेजच्या सभागृहात १३ डिसेंबरपासून राज्य नाट्य स्पर्धा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९ अमरावती–** नाट्य निर्मिती संस्था आणि नाट्यप्रेमींसाठी आनंदाची पर्वणी घेऊन येणारी राज्य नाट्य स्पर्धा डिसेंबर महिन्यात सुरू होत आहे. पुढील महिन्याच्या १३ तारखेपासून येथील सिपना अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या सभागृहात ही स्पर्धा सुरू होत असून, ती तब्बल १४ दिवसानंतर म्हणजे २६ डिसेंबरला समाप्त होईल. विधानसभा निवडणुकीच्या आचारसंहितेमुळे राज्य नाट्य स्पर्धेसह विविध कामे काहीशी रखडली होती. परंतु आचारसंहितेचा अडसर दूर झाल्याने आता एकेक बाब खुली होत आहे. त्याच अनुषंगाने राज्याच्या कला संचालनालयातर्फे आयोजित केली जाणारी आणि काहीशी लांबलेली राज्य नाट्य स्पर्धाही सुरू होत आहे. समन्वयाची जबाबदारी गतवर्षीचे समन्वयक विशाल फाटे यांच्याकडे सोपवण्यात आली आहे. १३ डिसेंबरला सायंकाळी ७ वाजता 'मोठ्यांचा शेक्सफियर' या नाटकाने राज्य नाट्य स्पर्धेचा प्रारंभ होईल. सुदर्शन खोत लिखित आणि आकाश पांडे दिग्दर्शित हे नाटक येथील विदूषक प्रतिष्ठान या नाट्य संस्थेतर्फे सादर केले जाणार आहे. त्यानंतरची बहुतांश नाटकेही स्थानिक लेखकांनीच लिहिली असून, दिग्दर्शन व प्रकाश योजनेसह नेपथ्यही



स्थानिक कलाकारांनीच केले आहे. मोठ्यांचा शेक्सफियर या नाटकाने शुभारंभ राज्य नाट्य स्पर्धेचा शुभारंभ मोठ्यांचा शेक्सफियर या नाटकाने होणार आहे. दुसऱ्या दिवशी वैभव देशमुख लिखित स्वधर्म हे नाटक सादर केले जाईल. त्यानंतर आला रे राजा, दसवा, पुत्रकामेष्ठी, 'द व्हल्टर अँड द लिटील गर्ल', काली, थलाई कुत्थल, उत्खनन, अनिमा, होमीसाईड, कमला आणि अंधारडोह ही नाटके सादर केली जाणार आहेत.

# अवैध होर्डिंग्ज, बॅनरधारकांवर आता फौजदारी कारवाई



## कारवाई होत नसल्याने न्यायालयाचा संताप, महापालिका आयुक्तांचे साहाय्यक आयुक्तांना आदेश

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९अमरावती**
फोटो आयुक्त आणि मनपा

शहरात अवैध होडींग्ज,बॅनर लावणाऱ्यांवर आता फौजदारी व दंडात्मक कारवाईचा बडगा उभारण्यात येणार असून, त्याबाबतचे आदेश महापालिका आयुक्त तथा प्रशासक सचिन कलंत्रे यांनी सर्व साहाय्यक आयुक्तांना दिले आहे.

दरम्यान, राज्यभरातील अवैध बॅनरच्या अनुषंगाने उच्च न्यायालयाने तीव्र संताप व्यक्त करून पुढील सुनावणीपूर्वी अहवाल सादर करण्याचे आदेश दिले आहे. त्यामुळे अमरावती महापालिकेकडूनही आता याबाबतची कारवाई मोहीम राबविण्यात येणार आहे.

राज्यभरात कोठेही अवैधरित्या होर्डींग्ज, बॅनर लावणाऱ्यांवर कारवाई होत नसल्याचा मुद्दा मुंबई उच्च न्यायालयाच्या मुख्य बेंचसमोर आला होता. त्यामुळे न्यायालयाने प्रचंड संताप व्यक्त केला आहे. याबाबत गत १८ ऑक्टोबर रोजी न्यायालयाने कारवाईचा अहवाल सादर करण्याचे आदेश राज्य शासनासह सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांना दिले होते. त्यानंतर महापालिकेनेही १८ नोव्हेंबर रोजी अवैध बॅनर,



होडींग्ज काढल्याचाअहवाल न्यायालयात सादर केला; मात्र महापालिकेने केवळ बॅनर काढण्याची कार्यवाही केली असून, संबंधितांवर कोणतीही फौजदारी किंवा दंडात्मक कारवाई केली नसल्याचे निरीक्षण न्यायालयाने नोंदविले. ही परिस्थिती इतरही जिल्ह्यांत असल्यामुळे येत्या १८ डिसेंबर रोजी याप्रकरणी पुन्हा सुनावणी होणार असून, त्यापूर्वी शहरातील अवैध बॅनरवर कारवाया करणे आवश्यक आहे. त्यानुसार दोन दिवसांपूर्वीच आयुक्तांनी पाचही साहाय्यक आयुक्त, बाजार व परवाना विभाग, अतिक्रमण निर्मूलन पथक प्रमुख आदींची बैठक घेतली.त्या बैठकीतील निर्णयानुसार अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक यांनी साहाय्यक आयुक्तांसह बाजार व परवाना विभागप्रमुखांच्या नावाने पत्र जारी केले आहे. त्यामुळे शहर विद्रुप करणाऱ्या या अवैध बॅनर, फ्लेक्सधारकांवर खरोखर कारवाई होते की नाही, याकडे लक्ष लागले आहे.

### राजकीय शुभेच्छा फलकांवर होणार का करकाई?

शहरात इतर व्यावसायिक बॅनरसोबतच मोठ्या प्रमाणात शुभेच्छा देणाऱ्या राजकीय नेत्यांचेही बॅनर, फ्लेक्स लागलेले दिसतात. यासाठी बरेचदा कोणतीही परवानगी घेतलेली नसते. त्यामध्ये काही आजी–माजी लोकप्रतिनिधींचाही समावेश असतो. त्यामुळे अशा बड्या राजकीय शुभेच्छुकांवरही कारवाई होते की लहानसहान फ्लेक्साधारकांचाच बळी घेतला जाईल, याकडेही सर्वांचे लक्ष लागले आहे.–

# राज्यात ‘पेसा’ क्षेत्रातील नगरपंचायती, नगर परिषदेसाठी कायदा केव्हा?

## ट्रायबल फोरमची केंद्र सरकारकडे मागणी : पंतप्रधान, केंद्रीय गृहमंत्र्यांना साकडे

विदर्भ प्रजासत्ताक

**दि.२९तिवसा** – राज्यात गावांची वाढती लोकसंख्या लक्षात घेऊन शासनाने अस्तित्वात असलेल्या पेसा क्षेत्रातील अनेक ग्रामपंचायती, नगरपंचायतीचा दर्जा दिला आहे. परंतु पेसा क्षेत्रात मोडणाऱ्या नगरपंचायती व नगर परिषदेच्या कारभाराबाबत संसदेने आजपर्यंत स्वतंत्र कायदा केला नसल्यामुळे त्या घटनात्मकदृष्ट्या बेकायदेशीर ठरतात. त्यामुळे संसदेने ‘पेसा’ क्षेत्रातील नगरपंचायत, नगर परिषदांसाठी स्वतंत्र कायदा करावा, अशी मागणी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडे ट्रायबल फोरमने केली आहे.देशामध्ये आदिवासीबहुल लोकसंख्या असलेले अनुसूचित क्षेत्र हे पेसा क्षेत्र म्हणून ओळखले जातात. या क्षेत्रासाठी घटनेच्या पाचव्या अनुसूचित विशेष तरतुदी आहेत. त्यामुळे राज्यघटनेच्या अनुच्छेद २४३ ‘य’ ‘ग’ नुसार नगरपरिषद संबंधी राज्यघटनेच्या भाग नऊ – क मधील अनुच्छेद २४३ थ ते अनुच्छेद २४३ ‘य’, ‘ख’ मधील तरतुदी पाचव्या अनुसूचित येणाऱ्या अनुसूचित क्षेत्रांना लागू होत नाही. त्यामुळे महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित क्षेत्रात तयार करण्यात आलेल्या नगरपंचायती कायदेशीर ठरू शकत नाही.




भारतीय संविधानात ७४वी घटना दुरुस्ती करण्यात आली आहे. अधिनियम १९९२ अन्वये नगरपरिषद कारभाराबाबत राज्यघटनेत भाग नऊ–कचा समावेश केलेला आहे. अनुसूचित क्षेत्रातील तालुका मुख्यालयांचे राज्यघटनेतील भाग नऊ–क मधील अनुच्छेद २४३ ‘थ’ नुसार नगरपंचायतीमध्ये रूपांतर केलेले आहे. राज्य घटनेतील भाग नऊ –‘क’ च्या तरतुदी अनुसूचित क्षेत्रासाठी लागू करण्यासाठी अपवाद व योग्य सुधारणासह कायदा करण्याचा अधिकार संसदेला आहेत. परंतु नगर परिषद संबंधी संसदेने अनुच्छेद २४३ ‘य’, ‘ग’ अंतर्गत कायदाच केला नाही. त्यामुळे अनुसूचित क्षेत्रातील गावांचे रूपांतर शहरात व नगरपंचायतमध्ये करताना राज्यघटनेचे उल्लंघन झाले आहे, असा आरोप केला आहे.

> देशाच्या राज्यघटनेचे वय ७५ वर्षे झाले आहे. लोकसभेमध्ये अनुसूचित जमातींसाठी ४७ जागा राखीव आहे. आदिवासी खासदार आदिवासी समाजाचे प्रतिनिधित्व करतात. मात्र आपल्याच समाजासाठी राज्यघटनेत असलेली पाचवी अनुसूची आणि तद्अनुषंगाने ‘पेसा’ कायद्याकडे त्यांचे दुर्लक्ष आहे, हे आदिवासी समाजाचे दुर्भाग्य आहे.
>
> – **डॉ. प्रमोद घोडाम**, राष्ट्रीय संस्थापक अध्यक्ष ट्रायबल फोरम

# मलिकांवरील गुन्ह्याच्या तपासाची माहिती द्या

## उच्च न्यायालयाचे पोलिसांना निर्देश

विदर्भ प्रजासत्ताक

**दि.२९ मुंबई** – महसूल अधिकारी समीर वानखेडे यांनी राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते नवाब मलिक यांच्याविरोधात अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती (अत्याचार) प्रतिबंध कायद्या अंतर्गत दाखल केलेल्या गुन्ह्याच्या तपासाबाबत माहिती देण्याचे निर्देश उच्च न्यायालयाने मुंबई पोलिसांना गुरुवारी दिले. करदाता सेवा महासंचालना लयाचे अतिरिक्त आयुक्त असलेल्या वानखेडे यांनी पोलीस तपासा बाबत उदासिनता दाखवित असल्याने हे प्रकरण सीबीआय कडे वर्ग करण्यासाठी उच्च



न्यायालयात याचिका दाखल केली आहे. न्या. रेवती मोहिते डेरे आणि न्या. पृथ्वीराज चव्हाण यांच्या खंडपीठाने गोरेगाव पोलीस ठाण्यातील अधिकाऱ्यांना पुढील सुनावणीस केस डायरीसह न्यायालयात उपस्थित राहण्याचे निर्देश दिले. दोन आठवड्यांत तपासाचा तपशील सादर करा, असेही निर्देश न्यायालयाने दिले. वानखेडे यांनी ऑगस्ट २०२२ मध्ये नवाब मलिक यांच्या विरोधात ट्रॉसिटी कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल केला. मलिक यांनी मुलाखत देताना जातीच्या आधारे माजी आणि कुटुंबियांची बदनामी केली आहे, असा आरोप वानखेडे यांनी केला आहे.

**वानखेडेंचे आरोप...**

मलिक राजकीय नेते असल्याने ते पोलिसांवर दबाव आणत आहेत. मलिक यांचा जावई समीर खान यांना ड्रग्स प्रकरणात अटक केल्यानंतर मलिक आपल्याला बदनाम करत आहेत, असे वानखेडे यांनी याचिकेत म्हटले आहे.

# पोलीस उपनिरीक्षक नियुक्ती प्रलंबित; सरकारची उदासीनता, न्यायालयाच्या स्थगितीचा फटका

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२९नागपूर : १३**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने (एमपीएससी) जून २०२२ मध्ये पोलीस उपनिरीक्षकांच्या ६०३ पदांसाठी जाहिरात दिली होती. त्यानंतर पूर्व, मुख्य परीक्षा, शारीरिक चाचणी व मुलाखती झाल्या. सर्वसाधारण गुणवत्ता यादीही जाहीर करण्यात आली. मात्र, तृतीयपंथी उमेदवारांसाठीचे धोरण ठरवण्यात शासनाकडून झालेला विलंब आणि आता न्यायालयाच्या स्थगितीमुळे ६०३ उमेदवार अंतिम गुणवत्ता यादी आणि नियुक्तीच्या प्रतीक्षेत आहेत.

पोलीस उपनिरीक्षक पदासाठी ८ ऑक्टोबर २०२२ ला पूर्व परीक्षा झाली. तृतीयपंथींना परीक्षेची संधी देण्यात आली तरी त्यांचे मूल्यांकन, आरक्षणाचा दर्जा, शारीरिक चाचणीचे निकष



यासंदर्भातील धोरण तयार नसल्याने पूर्व परीक्षेचा निकाल रखडला. हा निकाल लवकर लागावा म्हणून उमेदवारांनी लोकप्रतिनिधींना साकडे घातले. आयोगाला दिलेल्या निवेदनानंतर अखेर पूर्व परीक्षेचा निकाल जाहीर झाला. या परीक्षेच्या एक वर्षानंतर म्हणजे ऑक्टोबर २०२३ ला मुख्य परीक्षा घेण्यात आली. त्यावेळीही तृतीयपंथी उमेदवारांसाठी धोरण तयार नव्हते. त्यामुळे पुन्हा मुख्य परीक्षेचा निकाल रखडला.

निकाल जाहीर झाला पण लोकसभा निवडणुकीची आचारसंहिता आणि कमी मनुष्यबळाचे कारण देत आयोगाने शारीरिक चाचणी पुढे ढकलली. निवडणुकीनंतर शारीरिक चाचणी आणि मुलाखती झाल्या. १ ऑगस्टला सर्वसाधारण गुणवत्ता यादी जाहीर करण्यात आली. आता या प्रक्रियेला चार महिने उलटले आहेत. परंतु, अद्याप अंतिम गुणवत्ता यादी जाहीर झालेली नाही.

> **प्रतीक्षा यादीतील उमेदवारांचे नुकसान**
>
> पोलीस उपनिरीक्षक २०२२च्या परीक्षेची अंतिम गुणवत्ता यादी जाहीर झाली असती तर भरती प्रक्रियेतून बाहेर पडण्याच्या (ऑप्टिंग आऊट) पर्यायामुळे काही उमेदवार बाहेर पडले असते. त्यामुळे प्रतीक्षा यादीतील उमेदवारांना येथे संधी मिळाली असती. मात्र, अद्याप अंतिम यादी जाहीर न झाल्याने प्रतीक्षा यादीत येण्याची अपेक्षा असणारे उमेदवार आता २०२३च्या पोलीस उपनिरीक्षक भरतीच्या शारीरिक चाचणीची तयारी करीत आहेत.

# अचलपूर बाजार समितीत मका, सोयाबीनची ६० हजार पोते आवक

## आवक वाढल्याने बाजार समिती तीन दिवस बंद, शेतकऱ्यांसाठी भोजन, निवासाची व्यवस्था

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२९अचलपूर–**

अचलपूर कृषी उत्पन्न बाजार समितीत गुरुवारी मका व सोयाबीन या धान्याची सुमारे ६० हजार पोत्यांची आवक झाल्याने बाजार समितीचे मुख्य आवार पूर्णत: धान्याच्या थप्पीने भरून गेले होते. त्यामुळे टीएमसी यार्डवर हे धान्य ठेवावे लागले. काही क्षणातच टीएमसी यार्डही धान्याच्या पात्यांनी भरले. धान्याची एवढी आवक झाली की अचलपूर बाजार समिती प्रशासनाला बाजार समितीतील धान्य खरेदी विक्रीचे व्यवहार तीन दिवस बंद ठेवण्याचा निर्णय घ्यावा लागला.

अचलपूर कृषी उत्पन्न बाजार समितीत मेळघाटातील चिखलदरा, धारणीसह मध्य प्रदेशातील शेतकरी मोठ्या प्रमाणात धान्य विक्रीला आणतात.

सध्या मका व सोयाबीनची आवक वाढल्याने बाजार समितीत योग्य भाव व नगदी चुकारा होत असल्याने शेतकरी या बाजार समितीत धान्य विक्रीला प्राधान्य देतात.

गुरुवारी धान्याची झालेली आवक पाहता बाजार समिती प्रशासनाने धान्य घेऊन येणाऱ्या ट्रॅक्टर व इतर वाहनांना क्रमाक्रमाने सोडत धान्य खाली केल्यानंतर ही सर्व वाहने बाजार समितीच्या खुल्या जागेवर लावावी लागली.



त्यामुळे वाहतूक बराच वेळ विस्कळीत झाली होती. बाजार समितीचे सभापती राजेंद्र गोरले व संचालकांनी शेतकऱ्यांचा शेतमाल मोजमाप करण्यास उशीर होत असल्याने शेतकऱ्यांसाठी भोजन व निवासाची व्यवस्था केली. अडत्या व्यापाऱ्यांनी तत्काळ खरेदी करून मालाची उचल करावी, याबाबत त्यांच्याशी सकारात्मक चर्चा करून लिलावाला गती देण्याचे ठरव ले आहे. अचलपूर बाजार समितीने पणन महामंडळाच्या निर्णयानुसार मापारींना धान्य उतराई, वापसी, भराई याबाबत प्रतिक्विंटल व कट्ट्याप्रमाणे दर निश्चित केले आहेत. दर तीन वर्षांनी हे दर वाढवण्यासाठी बुधवारपासून काही मापारींनी आंदोलनाची भूमिका घेतली होती.

बाजार समिती प्रशासनाने प्रती कट्टा ८ रुपये दर निश्चित करत त्यांना आश्वासित केले. त्यावर काही हमालांनी सहमती दर्शवली तर काही हमालांनी मात्र विरोध दर्शवून ९ रुपये दर मागितला. त्यामुळे बाजार समितीत गुरुवारी लिलाव प्रक्रियेत अडथळा निर्माण झाला होता. मात्र, बाजार समितीचे संचालक मंडळ, अडत्या, व्यापारी यांनी घेतलेल्या योग्य भूमिकेमुळे बाजार समितीतील हमाल मापाऱ्यांनी कामकाज सुरू केले. परंतु हमाल, मापाऱ्यांनी शेतकऱ्यांची अडचण पाहता तूर्तास आंदोलन मागे घेतले तरी दरवाढीवर ते कायम राहणार असल्याचे म्हटले आहे.

# महापरिनिर्वाण दिनानिमित्त धावणार अनारक्षित विशेष रेल्वेगाड्या

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२९बडनेरा–** डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त प्रवाशांची अतिरिक्त गर्दी लक्षात घेऊन मध्य रेल्वे नागपूर ते छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस दरम्यान अनारक्षित विशेष गाड्या चालवणार आहे.

नागपूर ते मुंबई एकेरी विशेष गाड्या धावणार आहेत. विशेष गाडी क्रमांक ०१२६२ नागपूर येथून ०४ डिसेंबर रोजी २३.५५ वाजता सुटेल आणि छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस मुंबई येथे दुसऱ्या दिवशी १५.३० वाजता पोहोचेल. विशेष गाडी क्रमांक ०१२६४ नागपूर येथून ०५ डिसेंबर रोजी ०८.०० वाजता सुटेल आणि मुंबई येथे त्याच दिवशी २३.२० वाजता पोहोचेल. गाडी क्रमांक ०१२६६ नागपूर येथून ०५ डिसेंबर रोजी १५.५० वाजता सुटेल आणि मुंबई येथे दुसऱ्या दिवशी १०.५५ वाजता पोहोचेल. विशेष गाडी क्रमांक ०२०४० नागपूर येथून ०७ डिसेंबर रोजी १३.२० वाजता सुटेल आणि छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस मुंबई येथे दुसऱ्या दिवशी ०४.१० वाजता पोहोचेल. या गाड्यांना अजनी, सेवाग्राम, वर्धा, पुलगांव, धामणगांव, बडनेरा, मूर्तिजापूर, अकोला, जलंब, मलकापुर, भुसावल, जळगांव, चाळिसगांव, मनमाड, नासिक रोड, इगतपुरी, कसारा, कल्याण आणि दादर येथे थांबे राहील.



दोन गार्ड ब्रेक व्हॅनसह १६ सामान्य द्वितीय श्रेणीचे डबे अशी गाडीची संरचना राहणार आहे.

विशेष गाडी क्रमांक ०१२४९ मुंबई येथून ६ डिसेंबर रोजी १६.४५ वाजता सुटेल आणि नागपूर येथे दुसऱ्या दिवशी १०.०५ वाजता पोहोचेल. विशेष गाडी क्रमांक ०१२५१ मुंबई येथून ६ डिसेंबरला १८.३५ वाजता सुटेल आणि नागपूर येथे दुसऱ्या दिवशी १२.१० वाजता पोहोचेल. विशेष गाडी क्रमांक ०१२५३ दादर येथून ७ डिसेंबर रोजी ००.४० वाजता सुटेल आणि नागपूर येथे त्याच दिवशी १६.१० वाजता पोहोचेल. विशेष गाडी क्रमांक ०१२५५ मुंबई येथून ७ डिसेंबर १२.३५ वाजता सुटेल आणि नागपूर येथे दुसऱ्या दिवशी ०३.०० वाजता पोहोचेल. विशेष गाडी क्रमांक ०१२५७ मुंबई येथून ८ डिसेंबर १८.३५ वाजता सुटेल आणि नागपूर येथे दुसऱ्या दिवशी १२.१० वाजता पोहोचेल. विशेष गाडी क्रमांक ०१२५९ दादर येथून ८ डिसेंबर ००.४० वाजता सुटेल आणि नागपूर येथे त्याच दिवशी १६.१० वाजता पोहोचेल. या गाडीला दादर, कल्याण, कसारा, इगतपुरी, नाशिक रोड, मनमाड, चाळीसगांव, जळगाव, भुसावळ, मलकापूर, जलंब, अकोला, मूर्तिजापूर, बडनेरा, धामणगांव, पुलगांव, वर्धा, सेवाग्राम आणि अजनी येथे थांबा राहील. दोन गार्ड ब्रेक व्हॅनसह १६ सामान्य द्वितीय श्रेणीचे डबे अशी गाडीची संरचना राहणार आहे.

# एसटी कर्मचाऱ्यांची आज दिवाळी

## महामंडळानेच बोनससाठी केली ५२ कोटींची तरतूद

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२९ मुंबई** – राज्य परिवहन (एस.टी.) महामंडळाच्या कर्मचाऱ्यांना दिवाळी भेट म्हणून काही रक्कम देण्याचा निर्णय एसटीच्या संचालक मंडळाने घेतला असून आज, शुक्रवारी कर्मचाऱ्यांच्या खात्यात ६००० रुपये जमा होणार आहेत. ३१ ऑक्टोबर रोजी दिवाळी भेट रक्कम मंजूर करण्यात आली होती. परंतु, आचारसंहिता आणि राज्य सरकारने निधी देण्यासाठी केलेली टाळाटाळ, आदी कारणांमुळे ही रक्कम कर्मचाऱ्यांना दिवाळीनंतर मिळत आहे.दिवाळी भेट रकमेचा खर्च महामंडळाला स्वतःच्या तिजोरीमधून करावा लागणार



असल्याने राज्य सरकारने निधी उपलब्ध करून देणे अपेक्षित होते. परंतु, सरकारने ‘न’चा पाढा सुरूच ठेवल्याने आता एसटीवर ५२ कोटींचा अतिरिक्त बोजा पडणार आहे, असे एसटी कर्मचारी संघटनेचे सरचिटणीस श्रीरंग बरगे यांनी सांगितले. एसटी कर्मचाऱ्यांना मिळणारी दिवाळी भेट आचारसंहितेमुळे रखडली होती. सर्व कर्मचारी आणि अधिकारी यांना सरसकट ६००० रुपये इतकी रक्कम दिवाळी भेट म्हणून देण्यासाठी आचारसंहिता लागू होण्याअगोदर म्हणजेच १५ ऑक्टोबर रोजी एसटी प्रशासनाने ५२ कोटी रुपये देण्याचा प्रस्ताव सरकारकडे पाठवला होता. त्याबाबत महामंडळाने सरकारकडे वारंवार पाठपुरावाही केला. पण सरकारी अधिकाऱ्यांनी आचारसंहितेचे कारण पुढे केले होते. आता आचारसंहिता संपल्यामुळे कर्मचाऱ्यांना तातडीने दिवाळी भेट वितरित करावी, असे सरकारने एसटी प्रशासनाला कळविले. त्याचवेळी सरकारकडून ही रक्कम एसटीला मिळणार नाही असेही सांगण्यात आले. त्यामुळे सरकारने एसटी महामंडळाची फसवणूक केली आहे, अशी टीका बरगे यांनी केली आहे.

# आचारसंहिता भंग राष्ट्रवादीचे ‘स्टार प्रचारक’ कराळे गुरुजींवर गुन्हे दाखल

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२९ वर्धा : –** निवडणूक लागली की आदर्श आचारसंहिता लागू होत असते. त्याचे कसोशीने पालन करावे, असे निर्देश निवडणूक आयोग देत असते. जिल्हा निवडणूक कार्यालय मग तशी कठोर अंमलबजावणी करण्यास दक्ष राहते. आचारसंहितेनुसार प्रचार समाप्त झाल्यावर कुठल्याही पक्षाच्या स्टार प्रचारकास ३६ तासांच्या अवधीत किंवा मतदान प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत आपले विधानसभा क्षेत्र सोडून अन्य विधानसभा क्षेत्रात प्रवेश करण्यास मनाई असते. प्रवेश करण्यास किंवा हस्तक्षेप करण्यास मनाई आहे. असा दाखला देत वर्धा विधानसभा मतदारसंघाचे निवडणूक पथक प्रमुखांनी सावंगी पोलीस ठाण्यास तक्रार दिली. तक्रारीनुसार राष्ट्रवादी शरद पवार काँग्रेसचे स्टार प्रचारक नीतेश कराळे यांनी देवळी मतदारसंघातील त्यांचे मूळ मांडवा हे गाव सोडून वर्धा मतदारसंघातील उमरी मेघे येथे दाखल झाले. मतदान केंद्रावर येत वादविवाद केला. त्यामुळे आदर्श आचार संहितेचे उल्लंघन झाले. सबब त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात यावा, असे निवडणूक पथक प्रमुखांनी तक्रारीत नमूद केले आहे.

त्यानुसार आज सावंगी पोलिसांनी भारतीय न्याय संहिता, लोकप्रतिनिधित्व



अधिनियम अंतर्गत तीन वेगवेगळे गुन्हे कराळे यांच्यावर दाखल केले आहे.

मतदानाच्या दिवशी कराळे गुरुजी हे उमरी येथे आपल्या गाडीने सहकुटुंब पोहोचले होते. त्यावेळी त्यांनी तज्ञाच्या भूमिकेतून काही आक्षेप घेतले. ते चुकीचे आहे म्हणत गावचे माजी सरपंच सचिन खोसे यांनी कराळे यांना नाहक नाक कशाला खूपसता असे विचारत चांगलेच चोपले. हस्तक्षेप झाल्याने गुरुजी थोडक्यात वाचले, असे गावकरी बोलून गेले. मात्र त्यानंतर दोन्ही गटाकडून वादावादी पण सुरू झाली. भाजप उमेदवार डॉ. पंकज भोयर व काँग्रेस उमेदवार शेखर शेंडे हे पण घटनास्थळी आले. दोन्ही गटात वाद झडले. पोलीस पोहोचले. दोन्ही गटांच्या एकमेकाविरोधात तक्रारी झाल्या.

कराळे व खोसे यांच्यावर गुन्हे दाखल करण्यात आले. आता हे नव्याने गुन्हे आज दाखल करण्यात आले आहे. त्यामुळे करायला गेलो काय आणि झाले उलटे पाय, अशी गुरुजींची स्थिती झाल्याची चर्चा राजकीय वर्तुळत सुरू झाली आहे. विशेष म्हणजे ज्या गावात कराळे गुरुजी हस्तक्षेप करण्यास पोहोचले त्या गावात त्यांच्या काँग्रेस उमेदवारास खूप कमी मते पडली तर भाजप उमेदवारास चांगले मताधिक्य मिळाले हे विशेष.

# अमरावती जिल्ह्यातील मातब्बर बंडखोरांना मतदारांनी दाखवला घरचा रस्ता

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९अमरावती**

विधानसभा निवडणुकीत विविध प्रमुख राजकीय पक्षातील इच्छुकांना उमेदवारी न मिळाल्याने त्यांनी बंडाचे शस्त्र उगारले होते. महायुती आणि महाविकास आघाडीचे हात बंडाने पोळले होते. जिल्ह्यात पाच प्रमुख बंडखोर उमेदवार अपक्ष नशीब आजमावत होते. या सर्वांना मतदारांनी घरचा रस्ता दाखवला. पण, त्यांच्या हिमतीची चर्चा रंगली आहे.

अमरावतीत भाजपचे ज्येष्ठ नेते जगदीश गुप्ता यांची बंडखोरी गाजली. महायुतीची उमेदवारी राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाच्या सुलभा खोडके यांना मिळाल्याने जगदीश गुप्ता यांनी अपक्ष निवडणूक लढण्याचा निर्णय घेतला. महायुतीचे घटक असलेले युवा स्वाभिमान पक्षाचे रवी राणा यांनी त्यांना बळ दिले. तरीही त्यांना विजयाच्या समीप पोहचला आले नाही.



जगदीश गुप्ता यांना तिसऱ्या क्रमांकावर समाधान मानावे लागले. त्यांनी ३४ हजार ६७ मतांपर्यंत मजल मारली.

बडनेरात शिवसेना (उद्धव ठाकरे) पक्षाचे उमेदवार सुनील खराटे यांच्या विरोधात प्रीती बंड यांनी बंडखोरी केली होती, तर युवा स्वाभिमान पक्षाचे रवी राणा यांच्या विरोधात भाजपचे बंडखोर तुषार भारतीय यांनी दंड थोपटले होते. बडनेरात रवी राणा यांनी मोठ्या मताधिक्याने प्रीती बंड यांना पराभूत केले. सुनील खराटे हे तिसऱ्या क्रमांकावर फेकल्या गेले. तुषार भारतीय हे देखील चांगली कामगिरी करू शकले नाहीत. या दुहेरी बंडाचा लाभ रवी राणांना झाल्याचे चित्र समोर आले.

मोर्शी मतदारसंघात वेगळेच युद्ध पहायला मिळाले. या ठिकाणी महायुतीत मैत्रीपूर्ण लढत झाली, तर महाविकास आघाडीतही बंडखोरी झाली. चौरंगी सामन्यात भाजपचे उमेश यावलकर यांनी बाजी मारली. राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) यांच्या विरोधात काँग्रेसचे नेते विक्रम ठाकरे यांनी बंडखोरी केली होती, पण त्यांना चौथ्या क्रमांकावर समाधान मानावे लागले. मोर्शी मतदारसंघात हर्षवर्धन देशमुख आणि नरेशचंद्र ठाकरे या दोन ज्येष्ठ नेत्यांमधील राजकीय वैर सर्वश्रुत आहे. या संघर्षाचा लाभ मात्र यावेळी भाजपला मिळाला. राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाचे उमेदवार आणि आमदार देवेंद्र भुयार यांना मात्र आपली जागा गमवावी लागली.

अचलपूरमध्ये भाजपचे प्रवीण तायडे यांच्या विरोधात प्रमोदसिंह गड्रेल यांनी बंडखोरी केली होती, पण त्यांना देखील मतदारांनी नाकारले. मेळघाटमध्ये भाजपच्या बंडखोर ज्योती सोळंके यांनाही मतदारांनी प्रतिसाद दिला नाही.दर्यापूरमध्ये महायुतीत फूट पडली होती. शिवसेना (एकनाथ शिंदे) पक्षाचे अभिजीत अडसूळ यांच्या विरोधात युवा स्वाभिमान पक्षातर्फे भाजपचे माजी आमदार रमेश बुंदिले हे मैदानात उतरले होते. नवनीत राणा यांनी उघडपणे त्यांचा प्रचार केला, पण बुंदिले यांचा पराभव झाला. या ठिकाणी तिरंगी लढतीचा लाभ शिवसेना उद्धव ठाकरे गटाला झाला. महाविकास आघाडीची पत या एका विजयाने राखली गेली.

# विविधतेच्या रंगात अभाविपचे ७० वे राष्ट्रीय अधिवेशन संपन्न

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९अमरावती**

अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचे (अभाविप) ७० वे राष्ट्रीय अधिवेशन दिनदयाळ उपाध्याय गोरखपूर विद्यापीठ येथे २२ ते २४ नोव्हेंबर दरम्यान मोठ्या उत्साहात पार पडले. या अधिवेशनामध्ये भारताच्या विविधतेतील एकता, विविध राज्यांचा सांस्कृतिक वारसा आणि लघु भारताचे दर्शन घडले. पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त अभाविपने महेश्वर येथून काढलेल्या मानवंदना यात्रेने प्रयागराज, अयोध्या मार्गे अधिवेशन स्थळ गाठले. अधिवेशनाच्या आधी, २१ नोव्हेंबर रोजी महंत अवैद्यनाथ पवेलियन प्रदर्शनीचे उद्घाटन श्रीराम जन्मभूमी तीर्थक्षेत्राचे सरचिटणीस चंपत राय यांच्या हस्ते करण्यात आले.




**महामंत्री प्रतिवेदन आणि नवीन पदाधिकारी निवड**

राष्ट्रीय महामंत्री श्री. याज्ञवल्क्य शुक्ल यांनी वर्षभरात देशात राबवलेल्या उपक्रमांचे सादरीकरण केले. त्यांनी सांगितले की, सत्र २०२३ मध्ये ५५ लाख १२ हजार ४७० सदस्यसंख्या प्राप्त करून अभाविपने जगातील सर्वात मोठ्या विद्यार्थी संघटनेचा विक्रम केला आहे. यंदा प्रा. राजशरण शाही यांची राष्ट्रीय अध्यक्षपदी पुनर्निर्वाचित निवड झाली, तर डॉ. वीरेंद्रसिंह सोळंकी यांची राष्ट्रीय महामंत्रीपदी नियुक्ती करण्यात आली.

**महत्वाचे ठराव आणि पुरस्कार वितरण**

अधिवेशनात चार ठराव पारित करण्यात आले, ज्यामध्ये शैक्षणिक संस्थांची गुणवत्ता, शिक्षणाचे वाढते दर- महागाई, भोजनातील वाढती असमानता आणि मणिपूरमधील हिंसाचार यांसारख्या गंभीर सामाजिक प्रश्नांचा समावेश होता. अधिवेशनाच्या उद्घाटनप्रसंगी प्रमुख पाहुणे श्रीधर वैभव यांनी स्वावलंबन, उद्योजकता, रोजगार आणि विपश्यना यावर मार्गदर्शन केले. तसेच, यशवंतराव युवा पुरस्कार श्री दीपेश नायर यांना महंत श्री योगी आदित्यनाथ यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. या पुरस्कारामध्ये १ लाख रुपये रोख रक्कम, प्रमाणपत्र आणि स्मृतिचिन्ह देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी कार्यकर्त्यांचा उत्स्फूर्त सहभाग पहावयास मिळाला. दिनदयाळ उपाध्याय गोरखपूर विद्यापीठात झालेल्या या अधिवेशनात देशभरातून १२३२ कार्यकर्त्यांनी सहभाग नोंदवला. अधिवेशनाने देशातील युवा कार्यकर्त्यांमध्ये नवी ऊर्जा निर्माण केली असून, राष्ट्रीय एकात्मतेचे नवे पर्व घडवून आणले आहे.

# इन्स्टिटयूट ऑफ फार्मसी अँड रिसर्च, बडनेराच्या विद्यार्थिनीचे युवा महोत्सवात सुयश

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९अमरावती**

विदर्भ युथ वेलफेअर सोसायटी, अमरावती द्वारा संचालित इन्स्टिटयूट ऑफ फार्मसी अँड रिसर्च, बडनेरायेथे संस्थेचे अध्यक्ष डॉ. नितीन धांडे, उपाध्यक्ष ॲड. उदय देशमुख, कोषाध्यक्ष प्रा. डॉ. हेमंत देशमुख, सचिव युवराजसिंह चौधरी, कार्यकारिणी सदस्य नितीन हिवसे, प्रा. डॉ. पूनमताई चौधरी, पकंज देशमुख, प्रा. विनय गोहाड आणि प्रा. गजानन काळे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ सचिन दिघडे यांच्या मार्गदर्शनात विविध कार्यक्रमाचे आयोजन विध्यार्थी विकासासाठी केल्या जाते.येथील बी. फार्म. चतुर्थ वर्षाची विद्यार्थीनी कु. नफीसा शब्बीर हुसैन हिने युवा महोत्सवामध्ये यशाची शृखंला कायम ठेवत अव्वल स्थान प्राप्त केले आहे.कु. नफीसा हुसैन हिने डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला येथे आयोजित महाराष्ट्र राज्य आंतर विद्यापीठ युवा महोत्सव २०२४-२५ मध्ये वादविवाद स्पर्धेमध्ये द्वितीय स्थान प्राप्त केले. तिच्या यशाबद्दल संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठचे कुलगुरू मा. डॉ. मिलींद बारहाते ह्यांच्या हस्ते पारितोषिक व प्रशस्तिपत्र





देऊन गौरव करण्यात आला.सत्र २०२३-२४ मध्ये महाराष्ट्र राज्य आंतर विद्यापीठ युवा महोत्सव जे डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर येथे आयोजित करण्यात आले. या महोत्सवामध्ये वादविवाद स्पर्धेमध्ये कु. नफिसा हुसैन हिने द्वितीय क्रमांक पटकावून सलग दुसऱ्यांदा विद्यापीठाचे मा. कुलगुरूंच्या हस्ते कलर कोट तसेच मोनो प्राप्त केले.कु. नफीसा हुसैन हिने यापुर्वीही महाविद्यालयाचे तसेच विद्यापीठाचे नेतृत्व महाराष्ट्र राज्य आंतरविद्यापीठ इंद्रधनुष्य - २०२२ जे महात्मा फुले कृषी विद्यापीठ,राहुरी येथे आयोजित करण्यात आले होते त्यामध्येही क्रमांक पटकावुन यश संपादन केले होते.सत्र २०२२-२०२३ मध्ये ए. आ. यु. नवी दिल्ली तर्फे आयोजित प्रथम राष्ट्रीय महिला विद्यार्थी संसदे चे आयोजन जे डॉ. हरिसिग गौर विश्वविद्यालय, सागर, मध्य प्रदेश येथे करण्यात आले होते त्यामध्ये कु. नफिसा हुसैन हिने संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे प्रतिनिधित्व करत देशपातळीवर चतुर्थ स्थान प्राप्त केले होते. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सचिन दिघडे यांनी याप्रसंगी सांगितले की कु. नफिसा हिने आतापर्यत युवा महोत्सवामध्ये सलग दोन वर्ष कलर कोट प्राप्त करून महाविद्यालयास नावलौकिक प्राप्त केले. कु. नफिसा इतर उपक्रमाव्यतिरिक्त शैक्षणिक अभ्यासामध्येसुध्या चांगली प्रगती करत आहे. या यशासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सचिन दिघडे तसेच शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचार्यांनी कु. नफिसा हुसैन हिचे अभिनंदन केले.

# चांदुर बाजार येथे जगद्गुरु नरेंद्राचार्य महाराज यांचा पादुका दर्शन सोहळा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९चांदुर बाजार**

जगद्गुरु नरेंद्राचार्य महाराज यांचा भव्य पादुका दर्शन सोहळा ३ डिसेंबर २०२४ सकाळी ९ वाजता निर्मिती पब्लिक स्कूल चांदुर बाजार ते नानोरी रोड ,चांदूर बाजार ता.चांदुर बाजार जिल्हा अमरावती येथे आयोजित करण्यात आला आहे.जगद्गुरु नरेंद्राचार्य महाराज संस्थानाच्या वतीने अनेक सामाजिक उपक्रम राबविले जातात जसे की, ग्रामस्वच्छता अभियान, शैक्षणिक उपक्रमांतर्गत इंग्रजी माध्यमांची मोफत शाळा, मोफत वेदपाठ शाळा, रक्तदान शिबिर, वैद्यकीय उपक्रमांतर्गत मोफत दवाखाना, मरणोत्तर देहदान, मोफत रुग्णवाहिका सेवा महाराष्ट्रात विविध महामार्गावर ५३ रुग्णवाहिका २४ तास अखंडपणे अपघातग्रस्तांच्या सेवेत कार्यरत आहेत. तसेच आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांचे पुनर्वसन, महिला सक्षमीकरण अंतर्गत मोफत शिलाई यंत्र वाटप, मोफत घरघंटी वाटप, आपत्कालीन मदत उपक्रम,



कायदेविषयक साक्षरता शिबिरे, रक्तदान शिबिर, ब्लड इन नीड आदी आयोजित केली जातात. या कार्यक्रमासाठी पश्चिम विदर्भ पिठ अंतर्गत जिल्ह्यातील सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते, भाविक भक्त, साधक, शिष्य, हितचिंतक यांनीदि ३ डिसेंबर २०२४ जगद्गुरु नरेंद्राचार्य महाराज यांचा पादुका दर्शन सोहळा यांच्या कार्यक्रमाचा लाभ घ्यावा.या कार्यक्रमात दिनांक ३ डिसेंबर २०२४ रोजी उपासक दीक्षा संपन्न होणार आहे. तरी जास्तीत जास्त भक्तगण यांनी उपासक दिक्षा घेण्यासाठी नोंदणी करावी. या पादुका दर्शन सोहळ्यासाठी येणाऱ्या भाविकांसाठी कार्यक्रम स्थळी महाप्रसादाची व्यवस्था करण्यात आली आहे. तरी या महन्मंगल सोहळ्याला आपण सर्वांनी सहकुटुंब, सहपरिवार, आप्तइष्ट मित्रांसह उपस्थित राहून कार्यक्रमाचा लाभ घ्यावा असे आवाहन पश्चिम विदर्भ पीठ प्रमुख, पीठ व्यवस्थापक, पिठ समिती सदस्य, जिल्हा सेवा समिती, तालुका सेवा समिती, सेवाकेंद्र समिती , जिल्हा सेवा निरीक्षक अमरावती श्री. विनायक सवई साहेब, जिल्हासेवा अध्यक्ष श्री. मनोज भाऊ देशमुख,जिल्हा प्रसिद्धी प्रमुख अमरावती सौ. श्रेया ताई डिके ,उत्सव समिती प्रमूख .दिपक उघडे यांनी केले आहे.

# एकलव्य शाळेतील प्रवेशासाठी अर्ज करण्याचे आवाहन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९अमरावती**

चिखलदरा व धारणी येथील एकलव्य रेसिडेंशियल पब्लिक स्कुलमध्ये येत्या शैक्षणिक वर्षात आदिवासी क्षेत्रातील अनुसूचित जमाती, आदीम जमातीच्या विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यासाठी पात्र विद्यार्थ्यांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षात सहावीच्या सीबीएससी माध्यम, तसेच सातवी ते नववीच्या वर्गातील अनुशेष भरून काढण्यासाठी प्रवेशपूर्व




परीक्षा घेऊन प्रवेश देण्यात येणार आहे. शासकीय, अनुदानित आश्रमशाळा, सर्व जिल्हा परिषद, नगरपालिका, महानगरपालिका शाळा तसेच इतर शाळेत सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षात पाचवी ते आठवीत प्रवेशित असलेले विद्यार्थ्यांच्या पालकांचे उत्पन्न सहा लक्षापेक्षा जास्त नसावे.यासाठी परीक्षा दि. २५ फेब्रुवारी २०२५ रोजी सकाळी ११ ते २ या कालावधीत आश्रमशाळेच्या ठिकाणी घेण्यात येईल.

शाळेच्या मुख्याध्यापकां मार्फत प्रवेश अर्ज प्रकल्प कार्यालय, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, धारणी, अपर आयुक्त, आदिवासी विकास, अमरावती येथे स्वीकारल्या जाणार आहेत. तसेच प्रवेश अर्ज सर्व शासकीय, अनुदानित आश्रमशाळा व एकलव्य रेसिडेंशिल स्कुल, चिखलदरा येथे उपलब्ध आहेत.

अधिक माहितीसाठी प्रकल्प अधिकारी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प धारणी यांचे दुरध्वनी क्रमांक ०७२२६-२२४२१७ तसेच ९३७०५९३५५८ या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन सहायक जिल्हाधिकारी तथा प्रकल्प अधिकारी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प धारणीच्या प्रियंवदा म्हाडदळकर यांनी केले आहे.

# कृषी विभागाकडून पीकस्पर्धा : अकोला जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी सहभागी होण्याचे आवाहन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९अकोला**

राज्यामध्ये पिकांची उत्पादकता वाढविण्यासाठी प्रयोगशील शेतक-यांना प्रोत्साहन देण्याच्या हेतूने पीकस्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. रब्बी हंगामातील ज्वारी, गहू, हरभरा, करडई व जवस आदी पीकांसाठी स्पर्धेत सहभागी होण्यासाठी दि. ३१ डिसेंबरपर्यंत नोंदणी करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

प्रयोगशील शेतक-यांचे मनोबल उंचावण्यासाठी व अद्ययावत तंत्रज्ञानाच्या वापराकडे कल वाढविण्यासाठी ही स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. रब्बी हंगामासाठी तालुका, जिल्हा व राज्य पातळीवर सर्वसाधारण व आदिवासी गटासाठी ज्वारी, गहू, हरभरा, करडई व जवस या पाच पिकांसाठी पिकस्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.स्पर्धेत भाग घेण्यासाठी शेतकऱ्याकडे स्वतःच्या नावे जमीन असणे व ती जमीन तो स्वतः कसत असणे आवश्यक आहे. स्पर्धेत भाग घेणाऱ्या शेतकऱ्याला एकाच वेळी एकापेक्षा जास्त पिकासाठी स्पर्धेत



भाग घेता येईल.पीकस्पर्धेमध्ये सहभागी लाभार्थीच्या स्वतःच्या शेतावर त्या पिकाखाली किमान ४० आर क्षेत्रावर सलग लागवड असणे आवश्यक आहे. विहित नमुन्यातील अर्ज (प्रपत्र-अ), प्रवेश शुल्काचे चलन, सातबारा, आठ-अ चा उतारा, आदिवासी असल्यास जात प्रमाणपत्र, पीकस्पर्धेसाठी शेतकऱ्याने संबंधित ७/१२ वरील घोषित केलेल्या क्षेत्राचा चिन्हांकित केलेला नकाशा आवश्यक आहे. पीकनिहाय सर्वसाधारण गटासाठी रक्कम तीनशे व आदिवासी गटासाठी रक्कम दीडशे रू. प्रवेश शुल्क राहील.

**आकर्षक बक्षीसे**

राज्य पातळीवर ५० हजार, ४० हजार व ३० हजार रू. अशी अनुक्रमे पहिली तीन बक्षीसे आहेत. जिल्हा पातळीवर दहा, सात व पाच हजार रू. आणि तालुका पातळीवर पाच, तीन व दोन हजार रू. अशी अनुक्रमे तीन बक्षीसे आहेत.पीकांच्या क्षेत्रात आणि उत्पादनात वाढ व्हावी याकरीता जास्तीत जास्त शेतक-यांनी पिकस्पर्धेत सहभागी व्हावे, असे आवाहन कृषी विभागामार्फत करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी शेतकरी बंधुभगिनींनी संबंधित तालुका कृषी अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा, तसेच महाराष्ट्र शासन कृषी विभागाचे संकेतस्थळ www.krishi.maharashtra.gov.in ला भेट द्यावी, असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी शंकर किरवे यांनी केले.

# पी. आर. पोटे पाटील अभियांत्रिकीच्या एम.बी.ए. विभागातील विद्यार्थिनीची प्लॅनेट स्पार्क कंपनीत निवड

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९अमरावती**



पी. आर. पोटे पाटील अभियांत्रिकी व व्यवस्थापन महाविद्यालय अमरावती येथे एमबीए च्या विद्यार्थ्यांकरिता नुकताच पुणे येथील प्लॅनेट स्पार्क कंपनीचा कॅम्पस ड्राईव्ह संपन्न झाला यात कंपनीचे सर्वच राऊंड पार करत एमबीए विभागातील मुस्कान सोमाणी हिची निवड झाली असून वार्षिक ६.६४ लाखाचे पॅकेज मिळाले आहे.


प्लॅनेट् स्पार्क ही एक मध्यस्थ तंत्रज्ञान प्लॅटफॉर्म आहे जे केजी टू ट्वेल्थ आणि कार्यरत व्यवसायिकांना इंग्रजी संभाषण, व्याकरण, क्रिएटिव लेखन, वादविवाद, ब्लॉगिंग आणि इतर नवीन युग कौशल्यावर ऑनलाईन वर्ग प्रदान करते.

प्लॅनेट स्पार्क मध्ये निवड झाल्याबद्दल मुस्कान सोमाणी चे पी. आर. पोटे पाटील अभियांत्रिकी व व्यवस्थापन महाविद्यालयाने अभिनंदन करत पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# वाढीव मतदानाचे व्हिडीओ चित्रीकरणासह पुरावे सादर करा, नाना पटोलेंचं निवडणूक आयोगाला पत्र

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२९मुंबई**

विधानसभा निवडणुकीच्या निकालांविरोधात पराभूत उमेदवारांसह महाविकास आघाडीने आक्रमक भूमिका घेतली आहे. तसेच काँग्रेसनेही संध्याकाळी वाढलेल्या मतदानावर शंका उपस्थित केली आहे. निवडणूक आयोगाने जाहीर केलेली मतांची आकडेवारी पाहता मतदानाच्या दिवशी संध्याकाळी ५ वाजल्यानंतर मतदान केंद्रांवर लांबच लांब रांगा लागल्या असल्या पाहिजेत. राज्यातील किती मतदारसंघावर संध्याकाळी ५ नंतर मतदारांच्या लांब रांगा लागल्या होत्या? याचे व्हिडिओ चित्रीकरणासह पुरावे निवडणूक आयोगाने जाहीर करावेत, अशी मागणी करणारे पत्र काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी निवडणूक आयोगाकडे पाठवून केली आहे.




मुख्य निवडणूक अधिकारी यांना पाठवलेल्या पत्रात नाना पटोले पुढे म्हणतात की, निवडणूक आयोगाने प्रसिद्ध केलेल्या अधिकृत आकडेवारीनुसार २० नोव्हेंबर रोजी रात्री ११.३० वाजेपर्यंत ६५.२% मतदान झाले होते. दुसऱ्या दिवशी म्हणजे २१ नोव्हेंबर रोजी दुपारी ३ वाजता जाहीर केलेली अधिकृत आकडेवारी ६६.०५% होती. निवडणूक आयोगाने स्वतः अधिकृतरित्या जाहीर केलेल्या आकडेवारीत १.०३% ची तफावत कुठून आली? एका दिवसात तब्बल ९ लाख ९९ हजार ३५९ मतांची वाढ कशी झाली? मतांच्या टक्केवारीतील तफावत पाहता हा प्रकार गंभीर व चिंताजनक वाटत आहे. मतांच्या या वाढीबद्दल जनतेच्या मनातच शंका उपस्थित होत असतील तर त्या दूर करणे निवडणूक आयोगाचे कर्तव्य आहे. निवडणूक आयोगाने स्वतः पुढे येऊन आपली भूमिका पुराव्यासह स्पष्ट करावी आणि जनतेच्या मनातील शंकांचे समाधानकारक उत्तर द्यावे, असे या पत्रात नमूद केले आहे.

# राजकीय स्थितीत त्यागाची भावना ठेवून जनसेवेची लढाई लढणार-बच्चू कडू

## प्रहारची मुंबईत समीक्षा बैठक

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२९ मुंबई**

येणारा काळ हा संघर्षाचा असून जातीधर्माच्या राजकारणात आपल्याला सेवा व मुद्द्याचे राजकारण समोर आणायचे आहे. धर्म, जात, सत्ता, पैसा या राजकीय स्थितीमध्ये संघर्ष, सेवा, नियोजन व त्यागाची भावना ठेवून जनसेवेचा लढाई लढणार असे प्रतिपादन प्रहारचे संस्थापक अध्यक्ष बच्चू कडू यांनी केले.राज्यातील विधानसभा निवडणूक निकालांच्या पार्श्वभूमीवर प्रहार जनशक्ती पक्षाची महत्वपूर्ण चिंतन बैठक प्रहारपक्षाचे प्रमुख बच्चू कडू यांच्या अध्यक्षतेखाली मुंबईतील यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान याठिकाणी पार पडली.या बैठकीला संबोधित करत असताना ते



बोलत होते. विधानसभा निवडणुकीमध्ये लागलेला अनपेक्षित निकाल, प्रहारची भविष्यातील दिशा, इत्यादि विषयांवर या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीला माजी आ. राजकुमार पटेल, माजी आ.सबाणे, माजी आ. चंद्रिकापुरे, अनिल चौधरी, बल्लू जवंजाळ,गणेश निंबाळकर यांच्यासह प्रहार जनशक्ती पक्षाकडून विधानसभा निवडणूक लढवलेले उमेदवार, विविध जिल्हाप्रमुख, प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

प्रहार जनशक्ती पक्ष आणि बच्चू कडू यांची ओळख ही त्यांच्या जनसेवेच्या कामामुळे आहे. त्या कामातूनच आपल्याला प्रतिष्ठा आणि राजकीय संधी मिळाली आहे. यंदाच्या निवडणुकीत अपेक्षित निकाल लागला नाही म्हणून आपण खचून जाणार नाही. उलट आपण जनतेतच राहून यापुढेही जनसेवेचे काम अधिक जोमाने करत राहणार आहे. सत्तेत सहभागी होण्यासाठी अनेकांनी संपर्क केलं तरी आपण कुठलेही पद घेणार नाही, कारण अशा परिस्थितीत पद घेतले तर त्याला प्रतिष्ठा राहणार नाही.

### पदाधिकाऱ्यांना भावना झाल्या अनावर

प्रहारच्या चिंतन बैठकीमध्ये आपले मत व्यक्त करतांना काही पदाधिकाऱ्यांच्या भावना अनावर झाल्या होत्या. निवडणूकीचा पेपर खूप कठिण गेला कारण अभ्यास जनतेच्या सेवेचा व विकासाचा केला परंतु पेपर मात्र जातीधर्माचा निघाला. अश्या संवेदना यावेळी व्यक्त केल्या. येणारा काळ हा संघर्षाचा असून प्रहारचे अध्यक्ष बच्चू कडू हे ज्या प्रमाणे दिशा व निर्देश देतील त्याप्रमाणे आपल्या सर्वांची सामाजिक व राजकीय वाटचाल असेल असे देखील पदाधिकारी म्हणाले.बच्चू कडू हे संघर्षातून घडलेले नेतृत्व असून कुणापुढे न झुकता संघर्ष करावा आम्ही त्यांच्या मागे खंबीरपणे उभे आहोत असा विश्वास देखील पदाधिकाऱ्यांनी यावेळी दिला.

प्रहार आणि बच्चू कडू यांनी जी प्रतिष्ठा कमावली, ती जनतेच्या विश्वासातून मिळवली असून त्याला तडा जाईल असे आपण वागणार नाही. अशा शब्दांमध्ये बच्चू कडू यांनी उपस्थित पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांना प्रोत्साहन दिले. यापुढेही जनतेच्या विविध प्रश्नांसाठी संघर्ष करत राहणार आहे. कारण संघर्ष हीच खरी प्रहारची ताकत आहे. जनतेचे विविध प्रश्न अद्याप सुटले नाहीत, त्यावर काम करण्यासाठी आपण लवकरच दिशा निश्चित करून पुन्हा एकदा संघर्ष करण्यासाठी रस्त्यावर उतरणार आहेत. सेवेचं राजकारण आणि समाजकारण आपण पुढेही चालू ठेवणार आहेत. अशा प्रकारचा आशावाद यावेळी त्यांनी व्यक्त केला.याप्रसंगी विविध जिल्ह्यातून आलेल्या विविध पदाधिकाऱ्यांनी व उमेदवारांनी आपापले मत व्यक्त केले.

# जिल्ह्यात अपक्ष उमेदवारांनी मिळवली दीड लाखांवर मते

## बडनेरा मतदार संघात प्रीती बंड जिल्ह्यात अव्वल



**विदर्भ प्रजासत्ताक दि.२९अमरावती**

विधानसभा निवडणुकीची धामधूम आटोपली. आता निवडणुकीचे कवित्व सुरू झाले आहे. जिल्ह्यातील आठ मतदारसंघांतील ८३ अपक्षांनी जवळपास दीड लाखांवर मते ओढली आहेत.

अपक्षांनी सर्वाधिक मते बडनेरा मतदारसंघात घेतली असून प्रीती बंड या अपक्षांमध्ये सर्वाधिक म्हणजे ६० हजार ८२६ मते घेणाऱ्या उमेदवार ठरल्या आहेत. त्यापाठोपाठ अमरावतीमधून जगदीश गुप्ता (३४,०६७ मते) व मोर्शी मतदारसंघातील विक्रम ठाकरे (२६,७२९ मते) यांचा क्रमांक लागतो. मतदारसंघाचा विचार करता सर्वाधिक अपक्षांनी बडनेरा मतदारसंघातून मते घेतली आहेत.जिल्ह्यातील आठ विधानसभा मतदारसंघांपैकी अचलपूरमध्ये सर्वाधिक १४ अपक्ष उमेदवार रिंगणात होते, तर सर्वात कमी म्हणजे पाच अपक्ष तिवसा मतदारसंघातून लढले. म्हणजेच ८३ अपक्षांनी एकूण एक लाख ५३ हजार मते मिळविली. यंदाच्या विधानसभा निवडणुकीत अनेक मतदारसंघांमध्ये अपक्षांनी पक्षाच्या उमेदवारांना फेस आणला होता. काही ठिकाणी अपक्षांच्या मतांच्या गणितामुळे अनेकांची राजकीय समीकरणे सुद्धा बिघडले असल्याचे समोर आले.

**टॉप तीन अपक्ष विधानसभा निवडणूक २०२४**

प्रीती बंड ६०८२६
जगदीश गुप्ता ३४०६७
विक्रम ठाकरे २६७२९

# महायुतीच्या सरकारात लाडक्या बहीणींचा बोलबाला मंत्रिमंडळात रेकॉर्डब्रेक मंत्रीपदे; 'या' नावांची जोरदार चर्चा

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२९मुंबई**

सरकार स्थापनेबरोबरच महायुती सरकारचं मंत्रिमंडळ कसं असेल? याची देखील खलबतं तिन्ही पक्षांमध्ये सुरु झाली आहेत. त्यानुसार महिला आमदारांना किती मंत्रीपदं द्यायची याबाबत सकारात्मक बातमी समोर येत आहे. त्यानुसार महायुतीच्या सरकारमध्ये ७ महिला मंत्री असतील अशी माहिती साम टिव्हीच्या सुत्रांनी दिली आहे.संभाव्य महिला मंत्रांमध्ये महायुतीतील तिन्ही पक्षांतील आमदारांची वर्णी लागणार आहे. यामध्ये भाजपच्या चार महिला मंत्री, शिवसेनेच्या दोन आणि राष्ट्रवादीच्या एका महिला आमदाराला मंत्रीपद मिळेल अशी चर्चा आहे.




### कोण असतील संभाव्य मंत्री?

महाराष्ट्रातील महायुतीच्या सरकारमध्ये या संभाव्य महिला मंत्र्यांच्या नावाची जोरदार चर्चा सुरू आहे.

१. अदिती तटकरे (राष्ट्रवादी)
२. पंकजा मुंडे (भाजपा)
३. मनीषा कायंदे (शिवसेना)
४. माधुरी मिसाळ (भाजपा)
५. भावना गवळी (शिवसेना)
६. देवयानी फरांदे (भाजपा)
७. श्वेता महाले (भाजपा)

त्यामुळं यंदा पहिल्यांदाच इतक्या मोठ्या प्रमाणावर महिलांना मंत्रीपददिली जात असल्याची देखील चर्चा आहे.

### लाडकी बहीण योजनेचा इफेक्ट

दरम्यान, इतक्या मोठ्या प्रमाणावर महिलांना मंत्रीपदं देण्यामागं लाडकी बहीण योजनेचा इफेक्ट असल्याचं बोललं जात आहे. कारण या योजनेमुळेच महायुतीचं सरकार महाराष्ट्रात येऊ शकलं, महिलांच्या खात्यात दरमहा थेट १,५०० रुपये आधीच्या सरकारनं दिल्यानं त्याबदल्यात महिलांनी मोठ्या प्रमाणावर महायुतीला मतदान केलं. त्यामुळं राज्यातील समस्त महिला वर्गाला सरकारमध्ये योग्य प्रतिनिधीत्व देण्याच्या उद्देशानं तब्बल सात मंत्रीपदं महिलांना देण्याचा विचार सुरु आहे.

# आगामी निवडणुकांमध्ये भाजपकडे इनकमिंग वाढणार

## महापालिका, नगरपालिकांसह जिल्हा परिषद, पंचायत समित्यांकडे लक्ष



**विदर्भ प्रजासत्ताक दि.२९ अमरावती**

नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत जिल्ह्यात आठपैकी भाजपने सात जागा जिंकल्या. या जागा जिंकल्याने भाजपच्या पदाधिकारी, कार्यकर्त्यांचा आत्मविश्वास प्रचंड वाढला आहे. आता भविष्यात येणाऱ्या प्रत्येक निवडणुकीवर त्याचा परिणाम होणार असल्याचे बोलले जात आहे.तर काँग्रेस पदाधिकारी व कार्यकर्ते अजूनही ईव्हीएम वर खापर फोडण्यात व्यस्त आहेत.

जिल्हा परिषद, पंचायत समित्यांच्या निवडणुकांसह लवकरच महापालिकेची निवडणूक आता लवकरच लागण्याची शक्यता आहे. विधानसभा निवडणुकीत मिळालेले यश विचारात घेता येणाऱ्या निवडणुकांमध्ये भाजप तसेच महायुतीकडून लढण्यासाठी इच्छुकांची संख्या वाढण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. त्यामुळे भाजपाकडे इनकमिंग वाढण्याची शक्यता निर्माण झाली

आहे. नुकतीच विधानसभेची निवडणूक झाली. या निवडणुकीत भाजपाने अचलपूर,मेळघाट ,तिवसा,धामणगाव रेल्वे आणि मोर्शी वरुड मतदार संघावर आणले आहेत.तर बडनेरा आणि अमरावती मध्ये महायुतीचे उमेदवार विजयी झाले आहेत.मागील तीन वर्षांपासून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लांबल्या आहेत. जिल्हा परिषद, पंचायत समित्यांबरोबरच महापालिका. नगरपालिकांची निवडणूक लांबली आहे. या निवडणुकीत भाजपासह महायुतीने मिळविलेले यश पाहता भविष्यात होणाऱ्या सर्वच निवडणुकांकडे आता सर्वांचे लक्ष लागल्याने भाजपमध्ये इनकमिंग वाढेल, अशी शक्यता आहे.

# बेपत्ता मुले-महिलांबाबत राज्यभरात 'ऑपरेशन मुस्कान - १३' विशेष शोध मोहीम

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२९ पुणे १२**

राज्यात हरवलेल्या बालकांच्या व महिलांच्या संदर्भात 'ऑपरेशन मुस्कान -१३' ही विशेष शोधमोहीम १ डिसेंबर ते ३० डिसेंबर २०२४ या कालावधीत राबविली जाणार आहे. याचदरम्यान पुणे शहरातून हरविलेल्या बेपत्ता बालके (१८ वर्षांखालील व महिलांचा १८ वर्षांवरील) शोध घेण्यासाठी ही मोहीम राबविण्यात येणार आहे.

या मोहिमेच्या अनुषंगाने अनैतिक मानवी वाहतुक व्यापार प्रतिबंध कक्ष, गुन्हे शाखा येथे शहरातील सर्व परिमंडळातील पोलिस ठाणेनिहाय टीम तयार करण्यात आली आहे. ही टीम पुणे शहरातील सर्व पोलिस ठाण्यांना भेट देऊन सदर मोहिमेबाबत पोलिस ठाण्यातील पोलिस अधिकारी व कर्मचारी यांना समक्ष भेटून संबंधित मोहिमेबाबत माहिती देणार आहेत.


वरिष्ठ पोलिस निरीक्षक हे आपल्या पोलिस ठाणे स्तरावर या मोहिमेसाठी एक अधिकारी व तीन पोलिस कर्मचारी अशी विशेष टीम तयार करून त्यांच्याकडून ऑपरेशन मुस्कान-१३ द्वारे हरविलेल्या सर्व बालकांचा व १८ वर्षांवरील महिलांचा प्रभावीपणे शोध घेतला जाणार आहे. ऑपरेशन मुस्कान-१३ ही राज्यभरातील अल्पवयीन मुले आणि १८ वर्षांवरील महिलांचा शोध घेण्यासाठी एक प्रभावी उपक्रम आहे. पुणे शहरात मी सर्व अधिकाऱ्यांसह कर्मचाऱ्यांना याबाबतीत कडक आदेश दिलेले आहेत.

# थंडीची लाट, यलो अलर्ट जारी ! उत्तर भारतात आणि महाराष्ट्रात वाढला थंडीचा कडाका

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२९अमरावती**

उत्तर भारतात आणि महाराष्ट्रात थंडीचा कडाका चांगलाच वाढला आहे. किमान आणि कमाल तापमानातही घट होत आहे. बिहार आणि उत्तर प्रदेशच्या अनेक भागात धुक्याचे प्रमाण वाढले आहे, तर गुरुवारी (दि. २८) मध्य प्रदेशातील मांडला येथे देशातील सर्वांत कमी ६.५ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली. नगरमध्ये सर्वांत कमी ९.५ किमान तापमान होते. राज्यात नाशिक, नगर आणि पुण्यामध्ये थंडीच्या लाटेचा 'यलो अलर्ट' जारी केला आहे.

बंगालच्या उपसागरात तयार झालेल्या वादळी प्रणालीचे रुपांतर चक्रीवादळात होण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे. उत्तर भारत आणि महाराष्ट्रात थंडीचा कडाका असाच कायम राहणार आहे. मध्य प्रदेशातील मांडला येथे गुरुवारी (दि. २८) ६.५ अंश सेल्सिअसची नोंद झाली, तर धुळे आणि निफाड येथे ८ अंशावर तापमान होते.



पुण्यातील 'एनडीए'मध्ये ८.७ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली. त्यामुळे पुणेकरही चांगलेच गारठले आहेत. नाशिक, नगर आणि पुणे या भागात थंडीची लाट येणार असून, तिथे हवामान विभागाने यलो अलर्ट जारी केला आहे.

राज्यभरात अनेक ठिकाणी थंडीचा कडाका वाढला असून, गुरुवारी (दि. २८) धुळे येथील कृषी महाविद्यालय आणि निफाड येथील गहू संशोधन केंद्रात ८ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली. नगर येथे ९.५ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली. यात आणखी घट होऊ शकते. राज्यातील तापमानातील घट कायम राहू शकते, असा अंदाज हवामान विभागाने दिला.

**राज्यभर थंडीचा कडाका !**

राज्यातील बहुतांश शहरांचे किमान तापमान हे १० ते १४ अंश सेल्सिअसमध्ये नोंदवले जात आहे. काही ठिकाणी तर तापमानाचा पारा ८ अंशावर आला. त्यामध्ये पुण्यातील 'एनडीए'चा समावेश आहे. महाबळेश्वरला सर्वांत अधिक थंडी पडते. पण, या वेळेस इतर ठिकाणी तिथल्यापेक्षाही कमी तापमानाची नोंद होत आहे.

# सावधान ! सरकारी पाहुणे येत आहेत, सरबराईच्या तयारीला लागा

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२९नागपूर**

दरवर्षी नागपूरमध्ये होणारे विधिमंडळाचे हिवाळी अधिवेशन हे वैदर्भीय विशेषत: नागपूरकरांसाठी एक उत्सवच असतो. उत्सव या अर्थाने की या निमित्ताने संपूर्ण सरकार नागपूरमध्ये तब्बल दोन आठवडे मुक्कामी असते. मुख्यमंत्री, त्यांचे संपूर्ण मंत्रीमंडळ ठाण मांडून असते. सरकारच यणार म्हंटल्यावर त्यांच्या सरबराईसाठी सरकारी यंत्रणा हलणारच. या सरकारी पाहुण्यांच्या सरबराईसाठी मोठी तयारी केली जाते. नागपूरमध्ये सध्या हेच सुरू आहे.

राज्यात महायुतला प्रचंड बहुमत मिळाल्यावरही त्यांना मागील चार दिवसांपासून मुख्यमंत्री ठरवता आला नाही. दिल्ली-मुंबईत बैठकांवर बैठका सुरू आहेत. रुसवे फुगवे दूर केले जात आहे. मात्र मुख्यमंत्री काही ठरत नाही. नागपूरच्या भाजप कार्यकर्त्यांनी आणून ठेवलेले पुष्पगुच्छ, हार सुकू लागले आहेत. गुलाल तसाच पडून आहे. बँड पथकाला दिलेले निम्मे पैसेही त्यांच्याच कडे आहे. पण मुख्यमंत्री काही ठरत नाही. हे सर्व सांगण्याच्या मागे अर्थ हा आहे की त्याचा थेट संबंध विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनाशी आहे. या सर्व धावपळीतही नागपुरात अधिवेशनाच्या तयारीने गती घेतली आहे. मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, मंत्र्यांचे बंगले यांची देखभाल दुरुस्ती सुरू झाली आहे. ज्या भागात अधिवेशन होणार आहे त्या सिव्हील लाईन्सकडे जाणारे सर्व रस्ते गुळगुळीत केले जात आहे. सर्वसामान्य नागरिकांनी पावसाळ्यात खड्ड्यातून मार्ग शोधला पण सरकारी पाहुण्यांना कोणताही धक्का लागू नये म्हणून सार्वजनिक बांधकाम विभाग डोळ्यात तेल घालून काम करीत आहेत.